महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

दुरध्वनी क्र. २६४७८२५२ / २६४७४२११
ई-मेल : cedist.msedcl@gmail.com
**वेबसाईट : www.mahadiscom.in**

**[महाराष्ट्र शासन [उपक्रम])**
CIN : U४०१०९MH२००५SGC१५३६४५

प्लॉट क्र. जी-९, प्रकाशगड,
प्रा. अनंत काणेकर मार्ग,
वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१,

**मु.अ.(वितरण)/ भा.का.-१/परिपत्रक-अ/कृषी धोरण/११९१** **दिनांक : १५/०१/२०२१**

# परिपत्रक
## (कृषी धोरण)

**विषय :-**नविन कृषीपंप वीज जोडणी धोरण - २०२० अंतर्गत नवीन कृषीपंपं वीज जोडणी व कृषी वीज बिल थकबाकी वसुलीच्या अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक सूचना

**संदर्भ :-**शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र. १२१/ऊर्जा-५, दि. १८.१२.२०२०

सद्यस्थितीत कृषीपंप वीज जोडणी देण्याकरीता उच्चदाब वितरण प्रणाली योजना दि. ०५ मे २०१८ च्या शासन निर्णयान्वये कार्यरत आहे. सदर योजने अंतर्गत दि. ३१ मार्च २०१८ पर्यंत पैसे भरुन वीज जोडणी करीता प्रलंबित असणाऱ्या कृषीपंप वीज जोडण्या देण्यात येत आहेत.

दिनांक ०१ एप्रिल २०१८ पासून पैसे भरुन वीज जोडणी करीता प्रलंबित असणाऱ्या कृषीपंप अर्जदारांकरीता योजना अस्तित्वात नाही. सद्यस्थितीत राबविण्यात येणाऱ्या उच्चदाब वितरण प्रणालीची प्रगती, इतर पध्दतीने वीज जोडणी देण्यावर येणारी मर्यादा, याचा विचार करता यापुढे संभाव्य कृषीपंप अर्जदारांकरीता सर्वकष नवीन कृषीपंप धोरण प्रस्तावित करण्यात आले होते. त्यास, शासनाने शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र. १२१/ऊर्जा-५, दि. १८.१२.२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली आहे. **शासन निर्णयाची प्रत सोबत जोडली आहे.**

सदर शासन निर्णयाच्या अधीन राहून नवीन सर्वकष कृषीपंप वीज जोडणी धोरण- २०२०, क्षेत्रियस्तरावर खालीलप्रमाणे अंमलबजावणी करावयाची आहे.

### ➢ कृषी धोरण अंमलबजावणी बाबतची कार्यपद्धती व मार्गदर्शक सूचना :-

१. सदर धोरण राबविण्यासाठी पैसे भरुन प्रलंबित असलेल्या,नवीन अर्ज केलेल्या तसेच वापर असलेल्या सर्व शेतीपंपाचे सर्व्हेक्षणचे काम क्षेत्रिय स्तरावर Mobile App द्वारे करुन खालील माहिती संगणकीय प्रणालीमध्ये अद्यावत करण्यात येत आहे, जेणेकरुन पुढील नवीन वीज जोडणी व पायाभूत सुविधा उभारणीसाठी आवश्यक नियोजन व कार्यवाही खालीलप्रमाणे करता येईल.

अ. अस्तित्वात असलेल्या विद्युत प्रणाली पासून नवीन पंप जोडणी करीता लागणारे अंतर पडताळणे.

१. लघुदाब वाहिनी ----- कि.मी. किंवा पोलची संख्या
२. उच्च्दाब वाहिनी ----- कि.मी. किंवा पोलची संख्या

ब. रोहित्रावर पर्याप्त क्षमता आहे किंवा नाही याची पडताळणी करणे, नसल्यास पर्यायी व्यवस्था तपासणे जसे रोहित्र क्षमतावाढ, अतिरीक्त रोहित्र किंवा नवीन जोड वाहिनी टाकणे (लिंक लाईन) इत्यादी.

क. शेतीसाठी पाण्याच्या स्त्रोत संबंधी तपासणी करणे.

ड. महावितरण आपल्या दारी योजनेअंतर्गत वीज जोडणीची तपासणी घेतली आहे काय? असल्यास किती पोलचे अंतर आहे ते नमूद करावे.

वरीलप्रमाणे सर्व्हेक्षण त्वरीत पूर्ण करुन सदर सर्व माहीती Mobile App द्वारे संगणकीय प्रणाली मध्ये भरण्यात यावी व त्यानुसार वरील ग्राहकांना वीज जोडणी, तसेच पायाभूत सुविधा देण्याच्या दृष्टीने विभागीय व मंडळस्तरावर कार्यवाही करावी.

२. पैसे भरुन प्रलंबित असलेल्या व नवीन अर्जदारांच्या विहिरीचे अंतर नजीकच्या अस्तित्वात असलेल्या लघुदाब वाहिनीपासून ३० मीटरच्या आत आहे, अशा सर्व नवीन कृषीपंप अर्जदारांस त्यांना शक्य तो प्रत्यक्ष पाहणी दरम्यानच वीज जोडणी देण्यात यावी व Mobile App द्वारे NSC System मध्ये भरण्यात (Feed) यावा. सदर ग्राहकांना ३० दिवसाच्या आत वीज जोडणी देण्यात यावी.

३. पैसे भरुन प्रलंबित असलेल्या व नवीन अर्जदारांच्या कृषीपंपाचे अंतर अस्तित्वात असलेल्या लघुदाब वाहिनीच्या पोलपासून २०० मीटरच्या आत आहे व त्या रोहित्रावर पर्याप्त क्षमता उपलब्ध आहे, अशा सर्व कृषीपंप अर्जदारांना एरियल बंच केबलद्वारे ३ महिन्याच्या आत वीज जोडणी देण्यात येईल. अशा ग्राहकास तात्काळ वीज पुरवठा पाहिजे असल्यास वीज पुरवठयाकरीता आवश्यक असलेली एरियल बंच केबल वाहिनी अर्जदारास सुरुवातीस स्वत:च्या खर्चाने उभारावी लागणार असून सदर खर्चाचा परतावा त्या ग्राहकाच्या वीज बिलामधून करण्यात येईल. सदर खर्चाच्या परताव्याची रक्कम मंजूर अंदाजपत्रकीय रक्कमेपर्यंत मर्यादित राहील. जर अर्जदाराची आर्थिक कुवत नसेल तर अशा अर्जदारांना first come first basis वर शासनाद्वारे करण्यात आलेल्या आर्थिक तरतुदीनुसार अथवा वीज बील वसुली अंतर्गत संबंधीत भागातून प्राप्त झालेल्या महसुली जमा रक्कमेनुसार (Agriculture Contigencies Fund - ACF) वीज जोडणी देण्यात येईल.

४. पैसे भरुन प्रलंबित असलेल्या व नवीन अर्जदाराच्या कृषीपंपाचे अंतर अस्तित्वात असलेल्या लघुदाब वाहिनीच्या पोलपासून २०० मीटरच्या आत आहे, परंतु रोहित्रावर पर्याप्त क्षमता उपलब्ध नसल्यास, तेथील किमान ५ कृषीपंप ग्राहकांच्या समूहाला (त्यामध्ये किमान २ नवीन कृषीपंपाचे अर्ज असणे आवश्यक आहे) वीज पुरवठा करण्याकरीता संबंधित रोहित्राची क्षमता वाढ करुन एरिअल बंच केबल वाहिनीद्वारे ३ महिन्याच्या आत वीज पुरवठा देण्यात येईल. अशा ग्राहकास तात्काळ वीज पुरवठा पाहिजे असल्यास वीज पुरवठयाकरीता आवश्यक असणारी एरिअल बंच केबल वाहिनी अर्जदारास सुरुवातीस स्वत:च्या खर्चाने उभारावी लागणार असून सदर खर्चाचा परतावा, ग्राहकांच्या वीज बिलातून देण्यात येईल व सदर परताव्याची रक्कम मंजूर अंदाजपत्रकीय रक्कमेपर्यंत मर्यादित राहील. जर अर्जदाराची आर्थिक कुवत नसेल तर

अशा अर्जदारांना first come first basis वर शासनाद्वारे करण्यात आलेल्या आर्थिक तरतुदीनुसार अथवा वीज बील वसुली अंतर्गत संबंधीत भागातून प्राप्त झालेल्या महसुली जमा रक्कमेनुसार (Agriculture Contigencies Fund - ACF) वीज जोडणी देण्यात येईल.

५. पैसे भरुन प्रलंबित असलेल्या व नवीन अर्जदाराच्या कृषीपंपाचे अंतर अस्तित्वात असलेल्या लघुदाब वाहिनीच्या पोलपासून २०० मीटरच्या आत आहे व त्या रोहित्रावर पर्याप्त क्षमता उपलब्ध नसल्यास, तेथील किमान १० नवीन कृषीपंप ग्राहकांच्या समूहाला (त्यामध्ये किमान ५ नवीन कृषीपंपाचे अर्ज असणे आवश्यक आहे) १०० केव्हीए क्षमतेचे नवीन वितरण रोहित्र बसवून लघुदाब वाहिनी / एरिअल बंच केबलद्वारे ३ महिन्याच्या आत वीज पुरवठा देण्यात येईल. अशा ग्राहकास तात्काळ वीज पुरवठा पाहिजे असल्यास वीज पुरवठ्याकरिता आवश्यक असणारी लघुदाब वाहिनी अर्जदारास सुरुवातीस स्वत:च्या खर्चाने उभारावी लागणार असून सदर खर्चाचा परतावा त्या ग्राहकाच्या वीज बिलामधून करण्यात येईल. सदर खर्चाच्या परताव्याची रक्कम मंजूर अंदाजपत्रकीय रक्कमेपर्यंत मर्यादित राहील. जर अर्जदाराची आर्थिक कुवत नसेल तर अशा अर्जदारांची first come first basis वर शासनाद्वारे करण्यात आलेल्या आर्थिक तरतुदीनुसार अथवा वीज बील वसुली अंतर्गत संबंधीत भागातून प्राप्त झालेल्या महसुली जमा रक्कमेनुसार (Agriculture Contigencies Fund - ACF) वीज जोडणी देण्यात येईल.

६. पैसे भरुन प्रलंबित असलेल्या व नवीन अर्जदारांच्या कृषीपंपाचे अंतर अस्तित्वात असलेल्या लघुदाब व उच्चदाब वाहिनीपासून २०० मीटर पेक्षा जास्त व ६०० मीटरच्या आत आहे अशा कृषीपंप ग्राहकांना उच्चदाब वितरण प्रणालीद्वारे वीज जोडणी देण्यात येईल. अशा ग्राहकांस तात्काळ वीज पुरवठा पाहिजे असल्यास वीज पुरवठ्याकरीता आवश्यक असणारी उच्चदाब वाहिनी व वितरण रोहित्र अर्जदारांस सुरुवातीस स्वत:च्या खर्चाने उभारावे लागणार असून सदर खर्चाचा परतावा त्या ग्राहकांच्या वीज बिलामधून करण्यात येईल. सदर खर्चाच्या परताव्याची रक्कम मंजूर अंदाजपत्रकीय रक्कमेपर्यंत मर्यादित राहील. जर अर्जदाराची आर्थिक कुवत नसेल तर अशा अर्जदारांचे first come first basis वर आर्थिक तरतुदीनुसार वीज जोडणी देण्यात येईल. विशिष्ट परिस्थितीत कृषीपंपाचे अंतर ६०० मीटरपेक्षा जास्त असल्यास व परिस्थितीनुरुप अथवा ग्राहक आग्रही असल्यास ग्राहकास स्वखर्चाने उच्चदाब वितरण प्रणालीद्वारे वीज पुरवठा देण्यात येईल परंतु अशा परिस्थितीत परताव्याची रक्कम ६०० मीटर पर्यंतच्या मंजूर अंदाजपत्रकीय रक्कमेप्रमाणे मर्यादित राहिल.

७. लघुदाब वितरण प्रणालीवर देण्यात येणाऱ्या नवीन कृषीपंप वीज जोडण्या मीटरविरहित देण्यात याव्यात. मीटरच्या उपलब्धतेनंतर मीटर लावण्यात येतील. तसेच, उच्चदाब वितरण प्रणाली अंतर्गत विना मीटर विद्युत पुरवठा करण्यात येऊ नये.

८. नवीन अर्जदारांच्या कृषीपंपाचे अंतर अस्तित्वात असलेल्या लघुदाब व उच्चदाब वाहिनीपासून ६०० मीटर पेक्षा जास्त असल्यास अशा सर्व नवीन कृषीपंप ग्राहकांना सौर पंप महाऊर्जाद्वारे आस्थापित करुन देण्यात येईल.

९. ज्या ठिकाणी अस्तित्वात असलेले रोहित्र अतिभारीत असल्यास व त्या रोहित्रावरील भार कमी करण्याकरीता रोहित्राची क्षमता वाढ अथवा नवीन रोहित्र उभारण्यासाठी ग्राहकांनी स्वखर्चाने

काम करण्यास तयारी दर्शविल्यास सदर काम समर्पित वितरण सुविधा योजना (DDF) (नापरतावा) अंतर्गत ग्राहकांना स्वखर्चाने काम करण्यास त्वरीत मंजुरी देण्यात येईल.

१०. वरील प्रमाणे २ ते ७ बाबतीतील कार्यवाही कृषी ग्राहक सर्व्हेक्षणादरम्यान Mobile App द्वारे संकलीत केलेल्या माहितीच्या आधारे करण्यात येईल.

११. अ. क्र. २ ते ५ मधील कामे विभागीय स्तरावर निवड सूचीबध्द (empaneled) कंत्राटदारांमार्फत विभागीयस्तरावर करण्यात येतील.

१२. अ. क्र. ६ अंतर्गत येणारी कामे पूर्णत: टर्नकी (Full Turnkey) निविदेद्वारे परिमंडळस्तरावर व अंशत: टर्नकी (Partial Turnkey) मंडळस्तरावर निधीच्या उपलब्धतेनुसार निवड सूचीबध्द (empaneled) कंत्राटदारांमार्फत करण्यात येतील.

१३. मुदद्‌ क्र. <u>६</u> मुख्य अभियंता (विशेष प्रकल्प) यांच्या मार्फत सनियंत्रित करण्यात येईल.

१४. कृषीपंप वीज जोडणी धोरण - २०२० अंतर्गत जमा झालेल्या महसूलाचे ३ स्वतंत्र बजेट हेड SAP प्रणालीमध्ये तयार करुन खालीलप्रमाणे नियोजन करण्यात येतील.

अ) जमा झालेल्या वीज बील रक्कमेच्या ३३% रक्कम त्या ग्रामपंचायतमधील नवीन जोडणी तसेच पायाभूत सुविधा व विद्युत प्रणाली सक्षमीकरण व बळकटीकरण करण्यासाठी ग्रामपंचायतस्तरावर विभागीय कार्यालयाद्वारे वापरण्यात येईल.

ब) जमा झालेल्या वीज बील रक्कमेच्या ३३% रक्कम त्या मंडलस्तरावरील नवीन उपकेंद्र उभारणे व त्यासाठी आवश्यक इनकमर वाहिनी व निर्गमित वाहिनी (Outgoing feeders) उभारणे तसेच उपकेंद्रातील नवीन रोहित्र अथवा क्षमता वाढ, उपकेंद्र व वाहिन्यांची देखभाल व दुरुस्ती तसेच उपकेंद्रामधील स्टेशन टाईप कॅपॅसीटर बसवणे तसेच खराब झालेले कॅपॅसीटर बदलणे इत्यादी करीता मंडळस्तरावर वापरण्यात येईल.

क) वीज बील वसूलीच्या माध्यमातून जमा झालेली उर्वरित ३४% रक्कम मुख्य कार्यालयामार्फत वीज खरेदी, कर्ज परतफेड इत्यादीसाठी वापरण्यात येईल.

**१५. कृषीपंप धारक ग्राहकांसाठी पायाभूत सुविधांचे सक्षमीकरण करणे :-**

जिल्हयातील कृषीपंप धारकांकडून वसूल केलेल्या रक्कमेसाठी स्वतंत्र हिशोब ठेवला जाईल व वसूल करण्यात आलेल्या रक्कमेच्या ३३% रक्कम संबंधित ग्रामपंचायतीकरीता व ३३% रक्कम जिल्हयाकरीता दिली जाईल. त्यामध्ये संबंधित ग्रामीण भागातील महावितरणाच्या विजेच्या पायाभूत सुविधा (नवीन तसेच सक्षमीकरण) तसेच सेवा सुधारण्याकरीता उपयोग केला जाईल.

ग्रामपंचायत तसेच जिल्हास्तरावर करण्यात येणारी कामे प्रामुख्याने खालील प्रमाणे असतील--

**१. ग्रामपंचायतस्तर :**

अ) नवीन कृषीपंप वीज जोडणी

ब) वितरण रोहित्रांची क्षमता वाढ (येणाऱ्या नवीन कृषीपंप ग्राहकांसाठी)

क) नवीन वितरण रोहित्र बसविणे (येणाऱ्या नवीन कृषीपंप ग्राहकांसाठी)

ड) लघुदाब वाहिनीचे बळकटीकरण

इ) ११ के. व्ही./ २२ के.व्ही. वाहिनीचे बळकटीकरण

ई) ११ के. व्ही./ २२ के.व्ही. लाईन कॅपॅसीटर

वरील प्रमाणे अ ते ई कामे स्थानिक पातळीवर प्रचलीत पध्दतीनुसार संबंधित कार्यकारी अभियंता यांनी मंजूर करुन जिल्हयातील महावितरणच्या निवड सूचीबध्द (empaneled) कंत्राटदारामार्फत करण्यात येईल.

वसूल झालेल्या ३३% रक्कमेपर्यंत संबंधित ग्रामपंचायतीमधील कामांना मंजूरी देण्याचे अधिकार महावितरणच्या संबंधित कार्यकारी अभियंत्यास असतील.

**२.जिल्हास्तर :**

अ) उपकेंद्रामध्ये नवीन कॅपॅसीटर बसवणे तसेच खराब झालेले कॅपॅसीटर बदलणे.

ब) उपकेंद्रामधील अर्थिंग बदलणे / दुरुस्त करणे.

क) ११ के. व्ही. / २२ के. व्ही. / ३३ के. व्ही. उच्चदाब लिंक लाईन उभारणे.

ड) उपकेंद्रामधील देखभाल व दुरुस्तीचे कामे करणे.

इ) नवीन वितरण रोहित्र उभारणे व त्यासाठी आवश्यक उच्चदाब व लघुदाब वाहिनी उभारणे.

ई) नवीन उपकेंद्र उभारणे व त्यासाठी आवश्यक इनकमर वाहिनी व निर्गमित वाहिनी (Outgoing Feeders) उभारणे.

उ) ऊर्जा रोहित्र (Power Transformer) क्षमतावाढ व अतिरिक्त ऊर्जा रोहित्र बसवणे.

जिल्हयातील सर्व ग्रामपंचायतींकडून एकत्रीतपणे वसूल झालेल्या रक्कमेच्या ३३% रक्कमेपर्यंत मंजूरी देण्याचे अधिकार जिल्हयाचे पालकमंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली महावितरणच्या संबंधित मंडळ अधिक्षक अभियंत्यास राहतील. तसेच ACF(Agriculture Contigencies Fund) फंडाद्वारे उभारण्यात येणाऱ्या नवीन उपकेंद्र व संबंधित वाहिन्यांच्या मंजूरीचे अधिकार संबंधित अधिक्षक अभियंता यांना राहतील.

## ➢ कृषीपंप वीज जोडणी धोरण २०२० अंतर्गत कृषी वीज देयकाची थकबाकी वसुली :

**(अ) कृषीपंप वीज देयक सवलत धोरण २०२० ची ठळक वैशिष्टे -**

१. सर्व उच्चदाब, लघुदाब कृषी ग्राहक तसेच उपसा जलसिंचन योजनेतील चालू व कायमस्वरुपी वीजपुरवठा खंडित असलेले ग्राहक या योजनेत भाग घेण्यासाठी पात्र आहेत.

२. सदरील धोरणानुसार देण्यात येणारी सवलत दिनांक १८/१२/२०२० पासुन दिनांक ३१ मार्च २०२४ पर्यंत असेल.

३. लघुदाब कृषीपंप ग्राहकांच्या वीज बिलाबाबत तक्रारी असल्यास त्या कृषीपंप ग्राहकांचे मागील कमाल ५ वर्षापर्यंतचे (सप्टेंबर २०१५ पर्यंत) वीज बिल दुरुस्ती उपविभागीय स्तरावर करण्यात येईल. अशा ग्राहकांनी भरलेली वीज बिलाची रक्कम सुधारीत देयकामध्ये समायोजीत करण्यात येईल. अशा बिल दुरुस्तीसाठी उपविभागीय अधिकारी रु. एक लाख पर्यंत व त्यापुढील रक्कमेकरीता कार्यकारी अभियंता हे सक्षम अधिकारी असतील.

४. महावितरण संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये कृषीपंप ग्राहकांच्या थकबाकीवरील विलंब आकार व व्याज दराबाबत खालीलप्रमाणे (मुदद्‌ा क्र.५ व ६) निर्णय घेण्यात आला.

५. या धोरणात सहभागी होणाऱ्या सर्व कृषी ग्राहकांच्या मागील ५ वर्षापर्यंतच्या म्हणजेच माहे सप्टेंबर २०१५ पर्यंतचा थकबाकीवरील विलंब आकार पूर्णपणे (१००%) माफ करण्यात येऊन, सदर थकबाकीवर व्याज १८ टक्कयांपर्यंत न आकारता, मा. वीज आयोगाने मान्यता दिलेल्या खेळत्या भांडवलावरील (WORKING CAPITAL) व्याजदरानुसार आकारणी करुन थकबाकी निश्‍चित केलेली आहे - (थकबाकी - P)

६. पाच वर्षापूर्वीच्या म्हणजेच माहे सप्टेंबर २०१५ पूर्वीच्या थकबाकीवरील विलंब आकार व व्याज १००% माफ करुन केवळ मूळ थकबाकीच वसुलीसाठी ग्राह्य धरण्यात येईल. (थकबाकी - Q)

७. त्यानुसार सुधारीत नवीन थकबाकी (A=P+Q) अशी निश्‍चित करुन सुधारीत थकबाकी ३ वर्षासाठी दिनांक ३१/०३/२०२४ पर्यंत (वीज बिल दुरुस्ती लागू असल्यास) गोठविण्यात येईल व ग्राहकांच्या वीज बिलामध्ये ती वेगळी दर्शविण्यात येईल. अशा प्रकारे सुधारीत थकबाकीची रक्कम महावितरणच्या मोबाईल ॲपवर उपलब्ध राहील व ती महावितरणच्या सर्व अधिकाऱ्यांना / कर्मचाऱ्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रानुसार दिसेल व सर्व वीज ग्राहकांना सुध्दा पाहता येईल (सविस्तर माहितीसाठी परिशिष्ट ४ पहावे).

**८. सुधारीत नवीन थकबाकी (A=P+Q)**

| योजनेचे वर्ष | भरावयाची थकबाकी | भरलेली रक्कम | सुट | शिल्लक थकबाकी |
|---|---|---|---|---|
| प्रथम वर्ष | A | X | X | B=A-२*X |
| दुसरे वर्ष | B | Y | Y चे ३०% | C=B -१.३*Y |
| तिसरे वर्ष | C | Z | Z चे २०% | अंतिम थकबाकी = C-१.२*Z |

(याबाबतचा सविस्तर तक्ता उदाहरणासह परिशिष्ट "१" मध्ये समाविष्ट आहे.)
प्रथम वर्ष - १८/१२/२०२० ते ३१/०३/२०२२
दुसरे वर्ष - ०१/०४/२०२२ ते ३१/०३/२०२३
तिसरे वर्ष -०१/०४/२०२३ ते ३१/०३/२०२४

**टिप**: कायमस्वरुपी वीज पुरवठा खंडित झालेल्या ग्राहकांसाठी :-

**अ)** जर कायमस्वरुपी वीज पूरवठा खंडीत केल्याची तारीख ६ महिन्यापेक्षा अगोदरची असल्यास पुर्नजोडणी रक्कम व ३०% सुधारीत थकबाकी भरुन पुर्नजोडणी करण्यात येईल.

**ब)** जर कायमस्वरुपी वीज पूरवठा खंडीत केल्याची तारीख ६ महिन्यापेक्षा जास्त असल्यास किमान ३०% सुधारीत थकबाकी भरुन नवीन कृषीपंप धोरणानुसार पुर्नजोडणी करण्यात येईल.

**क)** उर्वरित थकबाकी वरील तक्त्यानुसार ग्राहकास भरता येईल.

**ड)** अशा प्रकारे कायमस्वरुपी वीज पुरवठा खंडीत झालेल्या ग्राहकांची थकबाकी ही वीज पुरवठा कायमस्वरुपी खंडीत केलेल्या दिनांकाच्या वेळी जी असेल तिच गृहित धरावी. (त्यावर वसुली दिनांकापर्यंतचे व्याज व विलंब आकार लावू नये.)

९. सहभागी होणाऱ्या ग्राहकांच्या गोठवण्यात आलेल्या सुधारीत थकबाकीवर व्याज तसेच विलंब शुल्काची आकारणी केली जाणार नाही.

१०. सर्व कृषी ग्राहकांना चालू वीज बिल भरणे बंधनकारक राहील व तसे न केल्यास ग्राहकाचा वीज पुरवठा खंडीत करण्यात येऊ शकतो.

११. सदर सवलतीचा लाभ घेण्यासाठी ग्राहकांना सर्व चालू बिले व थकबाकी भरणे बंधनकारक राहील. धोरणाच्या कालावधीतील चालू बिले न भरल्यास, चालू बिलावर नियमानुसार व्याज व विलंब आकार आकारण्यात येईल.

१२. एकदा सहभागी झालेला ग्राहक प्रत्येक चालू वीज बिलासह त्याच्या सोयीनुसार थकबाकी भरू शकतो (उदा. ३ महिने / ६ महिने इत्यादी.) अशा परिस्थीतीत वरील प्रमाणे गोठविण्यात आलेल्या थकबाकीवर व्याज व विलंब आकार लागु नसेल परंतु चालू वीज बिल न भरल्यास त्यावर व्याज व विलंब आकार लागेल. सवलतीच्या कालावधीमध्ये चालू वीज बिल व त्यावरील व्याज व विलंब आकार आणि थकबाकी भरुन त्यास सवलतीचा लाभ घेता येईल.

१३. जर कृषी ग्राहकांना चालू वीज बिल भरणे शक्य झाले नाही व त्यामुळे ग्राहकाचा वीज पुरवठा खंडित केला असेल, तरीही अशा ग्राहकांना या सवलतीचा लाभ घेता येईल. त्याकरीता ग्राहकाला चालू आर्थिक वर्षातील एकत्रित थकबाकी त्याच वर्षात भरण्याची मुभा राहील. मात्र, थकीत चालू बिलांवर नियमाप्रमाणे व्याज व विलंब आकार ग्राहकांना भरावा लागेल.

१४. वरील प्रमाणे कृषी पंपाचा कोणताही भरणा करताना मोबाईल नंबरची नोंद संगणकीय प्रणालीमध्ये अद्यावत करण्याची सुविधा उपलब्ध केली असून त्याप्रमाणे कृषी ग्राहकांचे मोबाईल नंबर अद्यावत करावे जेणेकरुन सदर योजनेचा पुढील पाठपुरावा करणे सोईचे होईल.

१५. कृषी पंप ग्राहकाने धोरणाअंतर्गत सुधारीत नवीन थकबाकी (A) व चालू बिल पुर्ण न भरल्यास सवलतीचे सर्व लाभ काढुन घेण्यात येतील व त्या ग्राहकास पूर्वी प्रमाणे व्याज व दंडासहीत देयक भरणे क्रमप्राप्त राहील. (भरणा केलेली रक्कम वगळता)

१६. या धोरणाअंतर्गत रोहित्र स्तरावरील सर्व कृषी ग्राहकांनी १००% चालू बिल व थकबाकी भरल्यास कृषीपंपाच्या चालू बिलाच्या रक्कमेवर १०% सवलत मिळेल. (याबाबतची सविस्तर माहिती उदाहरणासह परिशिष्ट "२" मध्ये समाविष्ट आहे).

१७. नियमीत वीज देयक अदा करणाऱ्या कृषी ग्राहकांनी देय तारखेपर्यंत चालू बिलाचा भरणा केल्यास त्यावर त्यांना ५% अतिरिक्त सवलत मिळेल. (सदर रक्कम ही ग्राहकाच्या बिलात वेगळी दर्शविण्यात येईल.) ही सवलत धोरण कालावधीत वरील नमूद केलेल्या मुद्या क्र. १६ व्यतिरिक्त राहिल. (या बाबतची सविस्तर माहिती उदाहरणासह परिशिष्ट "२" मध्ये समाविष्ट आहे.)

**अकृषीक ग्राहकांच्या वीज बिल वसूली करीता ग्रामपंचायतीस प्रोत्साहनपर मोबदला :-**

ग्रामपंचायत वगळता इतर कुठल्याही संस्थेस अकृषीक ग्राहकांच्या वीज बिल भरणा स्विकारण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले नाहीत. त्यामुळे, ग्रामपंचायत निहाय वसूलीनुसार खालील प्रमाणे प्रोत्साहनपर मोबदला देण्यात येईल.

| **मागील आर्थिक वर्षातील सरासरी वसुलीची कार्यक्षमता** | **ग्रामपंचायतीने प्राप्त केलेल्या वसूलीची कार्यक्षमता** | **फरक क = (ब-अ)** | **फरकावरील मोबदला** |
|---|---|---|---|
| **अ** | **ब** | **क** | **ड** |
| ०-५०% | | | २०% |
| ५०- ७५% | | | १५% |
| ७५% पेक्षा जास्त | | | १०% |

त्याकरीता क्षेत्रिय कार्यालयांना कृषीपंपाच्या सर्व्हेक्षणाबाबत व गाव / ग्रामपंचायत निहाय रोहित्र रेखांकन करण्याबाबत पूर्वीच सूचना देण्यात आलेल्या आहेत. (तथापि रेखांकन झाले नसल्यास ताबडतोब करुन घ्यावे.) त्याकरीता प्रत्येक गावाचे वितरण रोहित्र (DTC) हे NDM मध्ये गावनिहाय रेखांकन करणे गरजेचे आहे. जेणेकरुन सदर गावांची मागील वर्षातील सरासरी वसुलीची क्षमता व चालू वर्षी ग्रामपंचायतींनी साध्य केलेल्या वसुलीची क्षमता यांची तुलना करुन चालू वर्षी वसुलीची कार्यक्षमता जास्त असल्यास, येणाऱ्या फरकावरील मोबदला परिशिष्ट - ३ मध्ये नमुद केल्याप्रमाणे अदा करता येईल.

**(ब) कृषीपंप देयक भरणा अंतर्गत - ग्रामपंचायत / सहकारी साखर कारखाना / सहकारी सुत गिरणी / विविध कार्यकारी सहकारी संस्था / महिला बचत गट - नोंदणी व कार्यप्रणालीची पध्दत व प्रोत्साहन बाबतची वैशिष्टे :-**

१. सर्व कृषी ग्राहकांना वीज बिल भरण्याच्या सुविधेसाठी ग्रामपंचायत / सहकारी साखर कारखाना / सहकारी सुत गिरणी / विविध कार्यकारी सहकारी संस्था / महिला बचत गट **(यापुढे सर्वांना "संस्था " असे संबोधण्यात येईल.)** यांची मदत व सहभाग घेण्यात यावा.

२. यासाठी इच्छुक **"संस्था "** यांना सहभाग घेण्याकरीता महावितरणच्या वेब पोर्टलवर ऑनलाईन नोंदणी करणे बंधनकारक राहील. त्याकरीता सबंधित उपविभागीय अधिकारी यांनी मदत करुन प्रक्रिया पुर्ण करुन घ्यावी.

३. अशा प्रकारे ऑनलाईन नोंदणी कृत **"संस्था "**यांना त्यांच्या नेमून दिलेल्या कार्यक्षेत्रातील कृषी देयकांचा भरणा स्विकारण्याची सुविधा देण्यात येईल. (परंतु त्यासाठी संगणक किंवा मोबाईल हा स्वत:चा वापरावा लागेल) याव्यतिरिक्त फक्त नोंदणीकृत ग्रामपंचायतीस अकृषीक देयकांचा भरणा स्वीकारण्याची सुविधा देण्यात येईल.

४. वरील प्रमाणे कृषी व अकृषीक ग्राहकांचा भरणा करुन घेण्याची सुविधेपोटी या संस्थांना प्रती पावती रु. ५ असा मोबदला देण्यात येईल. याव्यतिरीक्त इतर प्रोत्साहन व विश्लेषण परिशिष्ट - ३ मध्ये समाविष्ट करण्यात आले आहे.

**५.** वरील उल्लेख केलेल्या विविध संस्थांपैकी सहकारी साखर कारखाना / सहकारी सूत गिरणी / विविध सहकारी संस्था / महिला बचत गट हे फक्त कृषी ग्राहकांचेच वीज बिल भरणा स्विकारण्यास अधिकृत असतील, सदर धोरणात सहभागी होणाऱ्या ग्रामपंचायती, कृषी व अकृषीक ग्राहकांचे वीज बिल भरणा स्विकारण्यास अधिकृत असतील.

**(क) कृषीपंप देयक भरणा - कर्मचाऱ्यांची कर्तव्ये व प्रोत्साहन :-**

- कृषीपंप देयक भरणा करण्यासाठी महावितरणचे सर्व कर्मचारी, संपर्क पोर्टल नोंदणीकृत बाहयस्त्रोत कर्मचारी, ग्राम विद्युत व्यवस्थापक (ऊर्जामित्र) यांचा सहभाग असेल.
- उपविभागीय अधिकारी महावितरण यांनी गावनिहाय रेखांकण करणे गरजेचे आहे जेणेकरुन ग्रामपंचायतीने चालू बिलाचा भरणा केल्यानंतर वीज बिल वसूलीच्या रक्कमेनुसार / क्षमतेनुसार मोबदला देणे शक्य होईल.
- या मोहिमेच्या व्यापक यशासाठी क्षेत्रिय स्तरावरील कर्मचाऱ्यांचा सहभाग आवश्यक व त्यासाठी कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन देण्यावर भर देण्यात येईल.

| **अ.क्र.** | **थकबाकी** | **प्रस्तावित प्रोत्साहन** | **पदनाम** |
|---|---|---|---|
| १ | **चालू थकबाकी** | वसूल केलेल्या रक्कमेवर १ टक्के | जनमित्र (लाईनस्टाफ / संपर्क पोर्टल नोंदणीकृत बाहयस्त्रोत कर्मचारी) |
| | | वसूल केलेल्या रक्कमेवर ०.५० टक्के | शाखाप्रमुख |
| | | वसूल केलेल्या रक्कमेवर ०.२५ टक्के | उपविभागीय अधिकारी |
| | | वसूल केलेल्या रक्कमेवर ०.२५ टक्के | उपविभागीय बिलींग कर्मचारी एकत्रितपणे |
| २ | **कायमस्वरूपी थकबाकी** | वसूल केलेल्या रक्कमेवर १० टक्के | लाईनस्टाफ /संपर्क पोर्टल नोंदणीकृत बाहयस्त्रोत कर्मचारी |
| | | वसूल केलेल्या रक्कमेवर ५ टक्के | शाखाप्रमुख |
| | | वसूल केलेल्या रक्कमेवर २.५ टक्के | उपविभागीय अधिकारी |
| | | वसूल केलेल्या रक्कमेवर २.५ टक्के | उपविभागातील बिलींग कर्मचारी एकत्रितपणे |

**टिप**:- वसुलीमध्ये जनमित्रांचा सहभाग लक्षात घेता, **" संस्थां "** द्वारे वसूल केलेल्या कृषीपंपाच्या थकबाकीच्या रक्कमेवर जनमित्रांना १% प्रोत्साहनपर मोबादला देण्यात येईल.

**(ड) उर्जामित्रांना (ग्राम विद्युत व्यवस्थापक) प्रोत्साहन :**

सदर धोरणाच्या व्यापक यशासाठी ग्राम स्तरावरील उर्जामित्रांचा (ग्राम विद्युत व्यवस्थापक) सहभाग अपेक्षित असेल. ज्याठिकाणी ग्रामपंचायत सहभागी नसेल तसेच महावितरणच्या जनमित्राऐवजी ग्राम विद्युत व्यवस्थापक कार्यरत असेल त्यांच्यासाठी खालील प्रमाणे प्रोत्साहन मोबदला देण्यात येईल.

- ज्याठिकाणी वीज बिल वसुली ग्रामपंचायत किंवा रोहित्रस्तरावर जनमित्र कार्यरत नाही त्याठिकाणी ग्राम विद्युत व्यवस्थापक यांनी वसूल केलेल्या चालू बिलाच्या रक्कमेतून ५% व थकबाकी रक्कमेच्या वसुलीच्या १०% प्रोत्साहनपर रक्कम देण्यात येईल. तसेच, जिल्हास्तरावर आवंटीत केलेल्या निधीमधून ग्रामपंचायतस्तरावरील उदा. कृषी सहाय्यक, कोतवाल इ. कर्मचाऱ्यांना प्रोत्साहनपर ५% पर्यंत रक्कम ग्रामपंचायत देऊ शकेल.
- ज्याठिकाणी ग्रामपंचायतीद्वारे करण्यात येणाऱ्या वीज बिल वसुलीमध्ये महावितरणचा जनमित्र उपलब्ध नाही, त्याठिकाणी ग्रामपंचायतीद्वारे वसूल करण्यात आलेल्या वीज बिल वसुलीपैकी १% रक्कम ही संबंधित उर्जामित्रांना (ग्राम विद्युत व्यवस्थापक प्रोत्साहन पर देण्यात येईल).

**(इ) कृषी वीज देयक सवलत अंमलबजावणीसाठी सक्षम अधिकारी व जबाबदारी :-**

**अ)** मुख्य कार्यालयस्तरावर मुख्य जनसंपर्क अधिकारी, मुंबईद्वारे सर्व प्रसिध्दी माध्यमांचा वापर करुन व्यापक जनजागृती करण्यात येईल.

**ब)** सह व्यवस्थापकीय संचालक / प्रादेशिक संचालक यांच्या स्तरावर खालील प्रमाणे अंमलबजावणी केली जाईल.

- या सवलती धोरणाचा सविस्तर अंमलबजावणी आराखडा तयार करणे.
- या आराखडा अंतर्गत कार्यालयीन मनुष्यबळ, उपलब्ध यांत्रिकी साधणे व इतर उपलब्ध साधनांचा वापर करण्याबाबतचे नियोजन करणे.
- वरील नियोजनाची अंमलबजावणी यंत्रणेबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना निर्गमित करणे.
- मोहिम यशस्वी होण्यासाठी आवश्यक जनजागृती तथा प्रसिध्दी उपाययोजना करणे.
- राज्याचे विविध मंत्री, मा. खासदार, मा. आमदार, प्रतिष्ठित नागरिक व इतर लोकप्रतिनिधी पर्यंत कृषीपंप वीज जोडणी धोरण २०२० अवगत करणे.
- या धोरणाअंतर्गत समाविष्ट वीज भरणा यंत्रणेचे घटक उदा. ग्रामपंचायत, सहकारी साखर कारखाना इत्यादींना सहभागी होण्यासाठी आवश्यक जागृती व महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी सहकार्य व सुसंवाद साधण्याबाबत सूचना निर्गमित करणे.
- महावितरणचे मोबाईल ॲप, डॅशबोर्ड या सुविधांचा कर्मचारी व अधिकारी यांनी प्रभावीपणे वापर करण्याबाबत कार्यवाही करणे. तसेच ग्राहकांनी मोबाईल ॲपचा प्रभावीपणे वापर करण्याबाबत जनजागृती करणे.
- सर्व कृषीपंप ग्राहकांनी या सवलतीचा लाभ घेण्यासाठी सहभागी होण्याबाबत व सहभागानंतर होणारे फायदे उदा. अखंडित वीज पुरवठा व त्यासाठी पायाभूत सुविधा उभारणा निधी इत्यादीबाबत ग्राहकांना लोकप्रतिनिधी मार्फत अवगत करणे.
- वरील कृषीपंप वीजजोडणी धोरण - २०२० अंतर्गत कृषी वीज देयकाची थकबाकी जास्तीत जास्त वसूल होण्यासाठी सनियंत्रण ठेवणे व याबाबतचा अहवाल मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महावितरण यांना वेळोवेळी देणे.

**मोबाईल ॲप व पोर्टलबाबतची माहिती - (महावितरण अधिकारी / कर्मचारी व ग्राहकांसाठी)**

- महावितरणचे सर्व अधिकारी / कर्मचारी हे **" AG POLICY 2020"** या मोबाईल ॲपचा वापर करुन त्यांच्या कार्यक्षेत्रांतर्गत सर्व कृषीपंप ग्राहकांना सवलत व वीज देयकाबाबत विविध माहिती उदा. मूळ थकबाकी, त्यावरील व्याज, विलंब आकार व त्यावर सवलतीनुसार माफ करण्यात येणारी रक्कम, जोडलेला अश्वशक्ती भार, रोहित्रे नाव व क्रमांक इत्यादी, देऊ शकतील.
- कृषीपंप धारक ग्राहकांकरीता त्याच्या कृषी वीज बिलावर मिळणाऱ्या सवलतीचा तपशील महावितरणच्या खालील लिंकवर उपलब्ध होईल.
  https://billcal.mahadiscom.in/agpolicy2020/
  लिंक वर क्लिक केल्यानंतर उपलब्ध असलेली माहिती **परिशिष्ट - ४** मध्ये उदाहरणासह समाविष्ट करण्यात आलेली आहे.
- मोबाईल ॲपचा वापर करुन संबंधीत महावितरण कर्मचारी / बाहयस्त्रोत कर्मचारी / ग्राम विद्युत व्यवस्थापक हे वीज ग्राहकांकडून वीज देयक भरणा करु शकतील.
- भरणा केलेली रक्कम संबंधीत बँकेत भरणा करुन त्याची माहिती उपविभागीय कार्यालये येथे देणे आवश्यक आहे व सदर भरणा विहित वेळेत बँकेत केला जातो याबाबतची खातरजमा करण्याची जबाबदारी उपविभागीय अधिकारी यांची राहील.
- याबाबत संबंधीत वीज कर्मचारी / बाहयस्त्रोत कर्मचारी/ ग्राम विद्युत व्यवस्थापक यांना वीज देयक स्विकारण्याची परवानगी व वीज बिल भरणा रक्कमा स्विकारण्याची मर्यादा यांचे अधिकार उपविभागीय अधिकारी महावितरण यांना असतील व याची नोंद महावितरण पोर्टलवर करण्याची सोय उपलब्ध करुन दिलेली आहे.
- सर्व उपविभाग B-६० वेळेत मंजूर करत असल्याची व त्याअनुषंगाने जमा झालेल्या रक्कमेची खातरजमा करण्याची जबाबदारी विभागीय कार्यालयाची असेल.

**(उ) महावितरण डॅशबोर्ड बाबतची माहिती :- (महावितरणचे सर्व अधिकारी, मा.मंत्री, मा. खासदार, मा. आमदार व लोकप्रतिनिधी, वीज दक्षता व सनियंत्रण समिती यांच्यासाठी)**

- महावितरणच्या डॅशबोर्ड वर कृषीपंप वीजजोडणी धोरण - २०२० बाबतची सर्व माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल.
- यामध्ये महावितरणच्या सर्व अधिकाऱ्यांना त्यांच्या कार्यक्षेत्राअंतर्गत उदा. शाखा निहाय ते प्रादेशिक कार्यालय निहाय उपलब्ध करुन देण्यात येईल.
- यामध्ये ग्रामपंचायती निहाय कृषीपंप ग्राहक, घरगुती, वाणिज्य व औद्योगिक ग्राहक, रोहित्र निहाय, गावनिहाय, जिल्हा निहाय, विधानसभा मतदार संघ निहाय, राज्यातील लोकसभा मतदार संघ निहाय वीज देयक भरणांचा तपशील व प्रगती अहवाल पाहता येईल.
- या डॅशबोर्डचा वापर करुन राज्याचे मा. मंत्री, मा. खासदार, मा. आमदार, वीज दक्षता व सनियंत्रण समिती तसेच महावितरणचे अधिकारी यांना उपलब्ध माहिती पाहता येईल.

- कृषी देयक भरणा निधीतून कृषीपंप धारक ग्राहकांकरीता पायाभूत सुविधांचे सक्षमीकरण करण्याबाबतचा निर्णय घेण्यासाठी या डॅशबोर्डचा वापर करता येईल.

**(ऊ) मिटरींग :**

**१. उच्चदाब वीज वाहिन्या :**

- ➢ सब स्टेशनमधून बाहेर पडणाऱ्या सर्व वीज वाहिन्यांचे AMR मिटरींग करण्यात आलेले आहे. प्रामुख्याने कृषी वीज वाहिन्यांवर बसविण्यात आलेल्या मिटर्सची पुन:पडताळणी जून २०२१ पर्यंत पूर्ण करण्यात यावे.

**२. वितरण रोहित्रे :**

- ➢ महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने स्थापन केलेल्या अभ्यास गटाच्या अहवालात नमूद करण्यात असलेल्या ५०२ कृषी वाहिन्यांवरील सर्व वितरण रोहित्रांचे जून-२०२१ पर्यंत मिटरींग करण्याचे उद्दिष्टीत आहे, यासाठी सविस्तर सूचना वेगळया निर्गमित करण्यात येतील, जेणेकरुन या वीज वाहिन्यावरील कृषी वीज वापराचा सखोल अभ्यास करता येईल.
- ➢ उपरोक्त मिटरींगची उपयुक्तता लक्षात घेऊन, नंतर उर्वरित वीज वाहिन्यांवरील वितरण रोहित्रांच्या मिटरींगमध्ये काम टप्प्याटप्प्याने हाती घेण्यात येईल.

**३. कृषी ग्राहक :**

- ➢ उच्चदाब वीज प्रणालीच्या माध्यमातून देण्यात येणाऱ्या सर्व नवीन कृषी वीज जोडण्या मा. वीज नियामक आयोगाच्या निर्देशानुसार प्रीपेड मीटरद्वारे देण्यात येतील.
- ➢ कृषी ग्राहकांचे मिटरींग तसेच त्यांची देखभाल करतांना येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन इतर वाहिन्यांवरील (उच्चदाब प्रणाली व्यतिरिक्त) कृषी ग्राहकांना विना मीटर वीज पुरवठा करण्यात यावा. अशा कृषी ग्राहकांना त्यांचा जोडभार व वाहिनीवरील वीज वापराच्या अनुषगांने फिडर इंडेक्सच्या माध्यमातून वीज वापर तपासून वीज बिल देण्यात यावे.

वरील प्रमाणे परिपत्रकाची अंमलबजावणी करण्यात यावी जेणे करुन महावितरणची थकबाकीची वसुली होऊन पायाभूत सुविधा उभारणीद्वारे वीज ग्राहकांना सुरळीत वीज पुरवठा देणे शक्य होईल.

## परिशिष्ट १

**उदाहरण -** एखाद्या कृषीपंप वीज ग्राहकाची एकूण थकबाकी रु. ३४,३०० इतकी आहे. त्यापैकी ५ वर्षावरील थकबाकी रु. १६,३०० व ५ वर्षापर्यंतची रु. १८,००० अशी आहे तर त्याची अंतिम थकबाकी रक्कम खालील प्रमाणे असेल.

| थकबाकीचा कालावधी | एकूण थकबाकी | मूळ रक्कम | विलंब देय शुल्क | व्याज | माफी | सुधारीत थकबाकी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **५ वर्षावरील थकबाकी (Q)** | **१६,३००** | **१०,०००** | **३००** | **६,०००** | **६,३००** | **१०,०००** | **व्याज+विलंब देयक शुल्क माफी** |
| **५ वर्षापर्यंतची थकबाकी (P) (वीज बिल दुरुस्ती नंतरच्या बिलानुसार)** | **१८,०००** | **१५,०००** | **५००** | **२,५००** | **१,९००*** | **१६,१००** | **सुधारीत व्याज व विलंब देय शुल्क माफी** |
| **धोरणासाठी ग्राहय धरण्यात येणारी थकबाकी (A)** | | | | | | **२६,१००** | |

***मा. वीज आयोगाने मान्यता दिलेल्या भांडवलावरील (Working Capital) व्याज दरानुसार पुर्ननिर्धारित व्याज व मूळ व्याज यातील फरक आणि विलंब आकार**

**परिस्थिती १ :- १ वर्षात सवलतीचा लाभ घेतला तर**

| धोरणाचे वर्ष | सुधारीत (गोठविलेली) थकबाकी | अदा करावयाची रक्कम | अदा केलेली रक्कम | अदा केलेल्या रक्कमेच्या माफीची टक्केवारी (%) | माफ केलेली रक्कम | शिल्लक रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| | **A** | **B** | **C** | **D** | **E= D% of C** | **F= A - (C+E)** |
| वर्ष १ | **२६,१००** | १३,०५० | १३,०५० | १०० | १३,०५० | ० |
| वर्ष २ | ० | ० | ० | ३० | ० | ० |
| वर्ष ३ | ० | ० | ० | २० | ० | ० |
| **एकूण** | | | **१३,०५०** | | **१३,०५०** | |

**परिस्थिती २ :- २ वर्षात सवलतीचा लाभ घेतला तर**

| धोरणाचे वर्ष | सुधारीत (गोठविलेली) थकबाकी | अदा करावयाची रक्कम | अदा केलेली रक्कम | अदा केलेल्या रक्कमेच्या माफीची टक्केवारी (%) | माफ केलेली रक्कम | शिल्लक रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| | **A** | **B** | **C** | **D** | **E= D% of C** | **F= A - (C+E)** |
| वर्ष १ | **२६,१००** | १३,०५० | १०,००० | १०० | १०,००० | ६,१०० |
| वर्ष २ | ६,१०० | ४,७०० | ४,७०० | ३० | १,४१० | -१० |
| वर्ष ३ | ० | ० | ० | २० | ० | ० |
| **एकूण** | | | **१४,७००** | | **११,४१०** | |

**परिस्थिती ३ :- ३ वर्षात सवलतीचा लाभ घेतला तर**

| धोरणाचे वर्ष | सुधारीत (गोठविलेली) थकबाकी | अदा करावयाची रक्कम | अदा केलेली रक्कम | अदा केलेल्या रक्कमेच्या माफीची टक्केवारी (%) | माफ केलेली रक्कम | शिल्लक रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| | **A** | **B** | **C** | **D** | **E= D% of C** | **F= A - (C+E)** |
| वर्ष १ | **२६,१००** | १३,०५० | ५,००० | १०० | ५,००० | १६,१०० |
| वर्ष २ | १६,१०० | १२,३९० | ५,००० | ३० | १,५०० | ९,६०० |
| वर्ष ३ | ९,६०० | ८,००० | ८,००० | २० | १,६०० | ० |
| **एकूण** | | | **१८,०००** | | **८,१००** | |

## परिशिष्ट २

### ग्राहकांना मिळणारी सवलत

**उदाहरण -**

अ) नियमित वीज देयक अदा करणाऱ्या (थकबाकी नसलेल्या) कृषी ग्राहकांना संगणकीय प्रणालीमध्ये टॅग करण्यात येईल. अशा प्रकारे नोंद केलेल्या कृषी ग्राहकांनी देय तारखेपर्यंत चालू बिलाचा भरणा केल्यास त्यावर ५% सवलत मिळेल. (सदर रक्कम ही त्याच्या बिलात वेगळी दर्शविण्यात येईल.)

ब) तसेच, एखाद्या रोहीत्रावरील १० ग्राहकांची चालू देयक रक्कम प्रत्येकी रु. ५,००० प्रमाणे एकूण रु. ५०,०००. त्यापैकी २ ग्राहकांची थकबाकी नसल्यास (टॅग केलेले) व इतर ८ थकबाकीदार ग्राहकांची एकूण थकबाकी ४,००,००० इतकी असेल व ग्रुप करुन जर सर्व ग्राहकांनी वीज देयक महावितरणच्या भरणा केंद्रावर देय तारखेपर्यंत वीज बिल भरल्यास त्यांना खालीलप्रमाणे सवलत मिळेल.

१. थकबाकीदार ८ ग्राहकांना प्रत्येकी ५,००० च्या चालू बिलावर १०% = रु. ५०० प्रत्येकी सवलत ग्राहकाच्या पुढील बिलात मिळेल. सदर १०% सवलत ही फक्त त्याच महिन्याकरिता मिळेल ज्या महिन्यात त्या रोहित्रावरील सर्व ग्राहकांनी चालू वीज देयक भरलेली असतील.

२. थकबाकी नसलेल्या (टॅग केलेले) २ ग्राहकांना रु.५,००० च्या चालू बिलावर (१० + ५) = १५% इतकी रु. ७५० सवलत ग्राहकाच्या पुढील बिलात मिळेल. सदर १०% सवलत ही फक्त त्याच महिन्यात मिळेल ज्या महिन्यात त्या रोहित्रावरील सर्व ग्राहकांनी चालू वीज देयक भरलेली असतील.

## परिशिष्ट ३

- **पोर्टलद्वारे "संस्थांना" वीज बिल भरणा केंद्र नोंदणीची प्रक्रिया :**

अ) संबधित उपविभागीय अधिकारी यांनी संबधित **"संस्था प्रमुख"** जसे सरपंच, ग्रामसेवक, संचालक इत्यादी यांची माहीती (आधार कार्ड, पॅन कार्ड व पत्ता इत्यादी) महावितरणच्या वेब पोर्टल वर अद्यावत करुन सदर ग्रामंपचायत नोंदणीकृत करावी.

ब) सरासरी भरण्याच्या तीन दिवसा इतकी रक्कम अनामत रक्कम म्हणून घेण्यात येईल व सदर अनामत रक्कम प्रत्येक महिन्याच्या १ तारखेला सुधारीत करण्यात येईल.

- **"संस्थां " द्वारे नवीन वीज बिल भरणा केंद्र नोंदणी पध्दत** :

अ) महावितरणच्या उपविभागीय अधिकारी यांच्या मदतीने **"संस्थांची "** महावितरणचे वेब पोर्टल द्वारे नोंदणी (Online) केली जाईल.

ब) वीज बिल भरणा केंद्राबाबतीत संस्थेला मान्यता देण्याचे अधिकार हे उपविभागीय अधिकारी यांना असतील.

क) मान्यतेनंतर **"संस्थांना "** महावितरणच्या संगणकीय प्रणालीद्वारे (OCCS) नविन कॅश कलेक्शन सेंटर कोडची उपलब्धता केली जाईल.

इ) ग्रामपंचायत वगळता इतर **"संस्थांना "** वीज बिल भरणा केंद्र मंजूरी नंतर "Maha power pay" वॉलेटद्वारे फक्त कृषी ग्राहकांच्या वीज देयकाचा भरणा स्विकारता येईल.

- **बिल स्विकारण्याची पध्दत :**

अ) ग्राहकांचा कृषीपंप वीज बिल भरणा प्रथम चालू बिलापोटी स्विकारण्यात येईल. त्यापेक्षा अधिक असलेली रक्कम ही ग्राहकांच्या थकीत बिलापोटी जमा दाखविण्यात येईल. अशा प्रकारे जमा रक्कमेवर लागू असलेली सवलत धरुन ग्राहकांची सुधारीत थकबाकी संगणक प्रणालीमध्ये (पोर्टल व अॅप) मध्ये दुसऱ्या दिवशी उपलब्ध असेल.

ब) सहभागी सर्व **"संस्थांना "** महावितरणच्या सर्व कृषी ग्राहकांचे वीज देयक स्विकारण्याची सुविधा देण्यात येईल. फक्त ग्रामपंचायतींना त्यांच्या कार्यक्षेत्रातील कृषी ग्राहकांसोबतच अकृषीक ग्राहकांचा भरणा स्विकारण्याची देखील सुविधा पुरवण्यात येईल.

क) योजनेतील सहभागी कृषीपंप ग्राहकांचे चालू बिल टाईप **RT-०१** व थकीत बील **RT-२६** या पावती प्रकाराने स्विकारावी. त्यानुसार B-६० तयार होईल.

संबधित **"संस्थांचे "** वर्क ऑर्डर (WORK ORDER). हे संगणकीय प्रणाली (WEB SERVICE) द्वारे तयार होऊन त्यावर पुढील कार्यवाही होईल. वीज ग्राहकांनी भरणा केलेली रक्कम संबंधित संस्थेद्वारे महावितरणच्या खात्यावर जमा झाल्यानंतरच त्याचा लाभ ग्राहकाला व संबंधित संस्थेला होईल.

- **"संस्थांना "प्रस्तावित मोबदला खालील प्रमाणे राहील :**

अ) प्रती वीज बिल पावती करीता रु. ५/- एवढी रक्कम दिली जाईल.

ब) शेतकरी सहकारी संस्था व साखर कारखान्यांनी वसुल केलेल्या कृषी थकबाकीच्या रक्कमेवर १० % रक्कम प्रोत्साहन म्हणून देण्यात येईल.

क) उर्वरीत "संस्थानी" कृषी थकबाकीचा भरणा स्वीकारल्यास, भरणा केलेल्या रक्कमेच्या ३०% प्रोत्साहन मोबदला दिला जाईल व चालू कृषी वीज बिलाचा भरणा स्वीकारल्यास, भरणा केलेल्या रक्कमेच्या २० % प्रोत्साहन मोबदला दिला जाईल.

**"संस्थांना" प्रस्तावित मोबदला उदाहरणासह स्पष्टीकरण.**

- **कृषी वीज बिल वसुलीसाठी प्रस्तावित मोबदला**

**उदाहरण -** एका महिन्यात २०० कृषीपंप ग्राहकाचे वीज देयक स्विकारले. त्यात रुपये ५०,००० एवढी रक्कम चालु बिलाची व रुपये ३,००,००० एवढी रक्कम थकबाकीतुन जमा केली. सदर **"संस्थेस "**प्रस्तावित मोबदला खालील प्रमाणे असेल.

**१) शेतकरी सहकारी संस्था व साखर कारखाने यांना**

अ) प्रती वीज बिल पावती साठी = २०० x ५= रु. १,०००

ब) थकबाकी वसुलीसाठीची प्रोत्साहन रक्कम = १०% x रु ३,००,०००= रु ३०,०००

**२) ग्रामपंचायती व इतर संस्थाना**

अ) प्रती वीज बिल पावती साठी = २०० x ५= रु. १,०००

ब) थकबाकी वसुलीसाठीची प्रोत्साहन रक्कम = ३०% x रु ३,००,०००= रु ९०,०००

क) चालू वीज बिल वसुलीसाठीची प्रोत्साहन रक्कम = २०% x रु ५०,०००= रु १०,०००

**एकुण प्रोत्साहन रक्कम = रु १,०१,०००**

- **अकृषीक वीज बिल वसुलीसाठी प्रस्तावित मोबदला (फक्त ग्रामपंचायतसाठी) :**

**उदाहरण -** सहभागी ग्रामपंचायतीने १५० अकृषीक ग्राहकांची वीज बिल स्विकारले. त्यात रुपये ७५,००० एवढी रक्कम चालू बिलाची व रुपये १,००,००० एवढी रक्कम थकबाकीतुन जमा केली तर ग्रामपंचायतीचा प्रस्तावित मोबदला खालील प्रमाणे असेल.

अ) प्रती वीज बिल पावती साठी = १५० x ५ = रु. ७५० (प्रत्येक महिन्यात वसुल केलेल्या बिलाच्या संख्येप्रमाणे अदा करण्यात येईल.)

ब) थकबाकी वसुलीसाठीची प्रोत्साहन रक्कम = २०% x (१,००,०००) = रु २०,०००

क) चालू वीज बिलाचा भरणा करुन घेतल्यास खालीलप्रमाणे मोबदला देण्यात येईल.

| मागील आर्थिक वर्षातील सरासरी वसुलीची कार्यक्षमता | ग्रामपंचायतीने प्राप्त केलेल्या वसूलीची कार्यक्षमता | फरक क = (ब-अ) | फरकावरील मोबदला |
|---|---|---|---|
| **अ** | **ब** | **क** | **ड** |
| ०-५०% | | | २०% |
| ५०- ७५% | | | १५% |
| ७५% पेक्षा जास्त | | | १०% |

**टिप -** सदर वसुली कार्यक्षमतेची परिगणना प्रत्येक महिनाअखेर त्याआधीच्या आर्थिक वर्षापासूनचे सर्व महिने विचारात घेऊन सरकत्या पद्धतीने (Sliding Collection Efficiency) निर्धारीत केली जाईल.

१. मागील आर्थिक वर्षातील सरासरी वसुली क्षमता - ४० % **(अ)** व चालू आर्थिक वर्षातील वसुली कार्यक्षमता - ८५ % **(ब)**. सदर भरणा झालेल्या रक्कमेपैकी ग्रामपंचायतीकडे प्रत्यक्ष भरणा झालेली रक्कम रु. ८०,००,००० असल्यास सदर ग्रामपंचायतीस मिळणारा मोबदला पुढील प्रमाणे :-

वसुली कार्यक्षमतेतील फरक = क = ब - अ ; ८५ % - ४० % = ४५ %

फरकावरील मोबदला = (४५ % X २० % X रु. ८०,००,०००)

**फरकावरील मोबदला = ९ %** (८०,००,०००) = रु.७,२०,०००.

२. मागील आर्थिक वर्षातील सरासरी वसुली क्षमता - ६० % **(अ)** व चालू आर्थिक वर्षातील वसुली कार्यक्षमता - ९० % **(ब)** सदर भरणा झालेल्या रक्कमेपैकी ग्रामपंचायतीकडे प्रत्यक्ष भरणा झालेली रक्कम रु. ९०,००,००० असल्यास सदर ग्रामपंचायतीस मिळणारा मोबदला पुढील प्रमाणे :-

वसुली कार्यक्षमतेतील फरक = क = ब - अ ; ९० % - ६० % = ३० %

फरकावरील मोबदला = (३० % X १५ % X रु. ९०,००,०००)

**फरकावरील मोबदला = ४.५ %** (९०,००,०००) = रु.४,०५,०००.

३. मागील आर्थिक वर्षातील सरासरी वसुली क्षमता - ८० % **(अ)** व चालू आर्थिक वर्षातील वसुली कार्यक्षमता - ९५ % **(ब)**. सदर भरणा झालेल्या रक्कमेपैकी ग्रामपंचायतीकडे प्रत्यक्ष भरणा झालेली रक्कम रु. ९५,००,००० असल्यास सदर ग्रामपंचायतीस मिळणारा मोबदला पुढील प्रमाणे :-

वसुली कार्यक्षमतेतील फरक = क = ब - अ ; ९५ % - ८० % = १५ %

फरकावरील मोबदला = (१५ % X १० % X रु. ९५,००,०००)

**फरकावरील मोबदला = १.५ %** (९५,००,०००) = रु.१,४२,५००.

# परिशिष्ट ४

कृषीपंप वीज जोडणी धोरण - २०२० अंतर्गत कृषी ग्राहकांसाठी, वीज कर्मचारी व अधिकाऱ्यांसाठी खालील प्रमाणे विविध माहिती संगणकीय प्रणालीद्वारे उपलब्ध करुन देण्यात येईल.

**महावितरण कर्मचाऱ्यांसाठी / ग्राहकांसाठी मोबाईल ॲप व पोर्टलवर उपलब्ध माहिती :**
सर्व उपविभागातील जनमित्र / शाखा अभियंता / उपविभागीय अधिकारी यांना महावितरणच्या "कर्मचारी मोबाईल ॲप" मध्ये त्याच्या कार्यक्षेत्रातील सर्व कृषीपंप ग्राहकांचा ग्राहक निहाय तपशील ग्राहक क्रमांक दिल्यानंतर, तसेच संबंधित कृषीपंप ग्राहक यांना महावितरणच्या मोबाईल ॲप मध्ये ग्राहक क्रमांक दिल्यानंतर त्यांच्या कृषीपंप ग्राहकांचा सविस्तर तपशील खालील प्रमाणे उपलब्ध राहील.

१) थकबाकीची माहिती - मूळ थकबाकी, व्याज व विलंब आकार इ.
   - ५ वर्षापूर्वीची (सप्टेंबर २०१५ ते सप्टेंबर २०२०) मूळ थकबाकी, त्यावरील व्याज व विलंब आकार
   - ५ वर्षापर्यंतची (सप्टेंबर २०१५ पर्यंत) मूळ थकबाकी, त्यावरील व्याज व विलंब आकार

२) ५ वर्षापर्यंतच्या थकबाकी वर सुधारित दराने आकारणी केलेले व्याज (सप्टेंबर २०१५ ते सप्टेंबर २०२०)

३) कृषीपंप वीज जोडणी धोरण - २०२० नुसार लागू असलेली व्याज व विलंब आकारावरील एकूण माफी.


४) सदर माफीनंतर ग्राहकाने भरावयाची सुधारीत थकबाकी रक्कम.


५) योजनेच्या कालावधीमध्ये वेगवेगळया कालावधीत (पहिल्या, दुसऱ्या किंवा तिसऱ्या वर्षी) थकबाकी चालू वीज बिलासह भरल्यास, ग्राहकास मिळणाऱ्या थकबाकी माफीचा तपशील.

६) कर्मचाऱ्यांकरिता व ग्राहकांकरिता उपलब्ध माहिती खालील प्रमाणे असेल. तसेच वीज बिला संदर्भात तक्रार नोंदविण्याची सुविधा देखील उपलब्ध असेल.


**उदाहरण -** ग्राहक क्र.xxxxxxxxxxxx या कृषीपंप वीज ग्राहकाचे बिल सवलतीनुसार कसे असेल या करीता मोबाईल ॲप मध्ये वरील ग्राहक क्रमांक नोंद केल्यास त्याची माहिती पुढील प्रमाणे उपलब्ध असेल.


## मोबाईल ॲपचे दृतचित्रे (Screen Shot):







**मोबाईल ॲपचे दृतचित्रे (Screen Shot):**



**मोबाईल ॲपचे दृतचित्रे (Screen Shot):**




वरील उदाहरणातील ग्राहकांची एकूण थकबाकी रक्कम ही रु.८८,८५३.९७ अशी होती त्यात सवलतीनुसार रु. १२,८४७.६६ एवढे व्याज व रु. १,२०२.१ एवढा दंड अशी एकूण १४,०४९.७६ एवढी रक्कम माफ करुन त्याची नवीन सुधारीत थकबाकी रक्कम ही ७४,८०४.२१ अशी असेल. सदर सुधारीत थकबाकी रक्कम ही सवलत कालावधीकरिता गोठविण्यात येणार आहे. सदर गोठविलेली सुधारित थकीत रक्कम ही ग्राहक ३ वर्षात भरु शकतो. (याबाबतचे उदाहरणासह स्पष्टीकरण परिशिष्ट - १ मध्ये समाविष्ट आहे.)

उपविभागीय अधिकाऱ्यांमार्फत मंजूरी प्रदान केलेल्या जनमित्रांना ॲपद्वारे वीज बिल संकलन करता येईल. (सदर वीज बिल संकलन मर्यादा उपविभागीय अधिकाऱ्याद्वारे वेब कन्सोल वर प्रत्येक कर्मचाऱ्यासाठी निश्चित केली जाईल.)

उपविभागातील सर्व अधिकारी कर्मचारी यांनी थकबाकीदार कृषीपंप ग्राहकांच्या वसुलीसाठी राबविलेल्या मोहिमेत ते पात्र असलेले प्रोत्साहन मोबदला त्यांच्या मानव संसाधन विभागाच्या (HRMS) प्रणालीशी जोडून त्यांच्या खात्यावर रक्कम अदा केली जाईल. यासाठी प्रत्येक जनमित्राचे तपशील गाव / रोहित्र याला जोडणे आवश्यक आहे.

**ग्राहकांसाठी तक्रार निवारण सुविधा -**

- कृषी ग्राहकाची वीज बिलासंबंधी तक्रार नोंदवली असल्यास, सदर ग्राहकांची तक्रार व स्थळ तपासणी अहवाल भरण्याची सुविधा जनमित्र / शाखा अभियंता / उपविभागीय अधिकारी यांना मोबाईल ॲपद्वारे उपलब्ध राहील.
- वीज बिलासंबंधी काही तक्रार असल्यास, संबंधित ग्राहकांची तक्रार महावितरण टोल फ्री.नंबर १९१२, १८००-२३३-३४३५ किंवा १८००-१०२-३४३५ या क्रमांकावर, मोबाईल ॲप व पोर्टल किंवा उपविभागात स्वीकारली जाईल.
- जनमित्र सदर तक्रार नोंदविण्यासाठी कर्मचारी ॲपचा वापर करतील. तसेच तक्रार नोंदविल्यानंतर जनमित्राद्वारे ग्राहकांच्या शेतीपंप स्थळ तपासणी अहवाल मोबाईल ॲपद्वारे अपलोड केला जाईल.
- ग्राहकाची तक्रार व जनमित्राने ॲपद्वारे सादर केलेला अहवाल, उपविभागीय अधिकाऱ्याला CRM पोर्टलद्वारे पडताळणी करुन संबंधित ग्राहकांचे वीज देयक दूरुस्ती रक्कम रु. एक लाख पर्यंत OBR (online bill revision) प्रणाली मधून मंजूरी देतील. वीज देयक दूरुस्ती रक्कम रु. एक लाखापेक्षा जास्त असल्यास कार्यकारी अभियंता हे मंजूरीकरिता सक्षम अधिकारी असतील.
- अशा प्रकारे वीज बिल दुरुस्तीसाठी समायोजन रक्कम संगणक प्रणाली मध्ये मंजूर झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी सदर ग्राहकाची योजनेअंतर्गत सुधारीत देय थकबाकी ग्राहकांच्या लिंकवर आणि मोबाईल ॲपद्वारे उपलब्ध असेल. तसेच ग्राहकांस सुधारीत देय रक्कम SMS द्वारे कळविली जाईल.

कृषीपंप वीज जोडणी धोरण - २०२० ची प्रभावीपणे व जलदगतीने अंमलबजावणी करण्याकरीता नवीन कृषीपंप वीज जोडणी व थकबाकी वसुली याकरीता मुख्य कार्यालय येथे २ स्वतंत्र नियत्रंण कक्ष, श्रीमती पुष्पा चव्हाण, मुख्य अभियंता (विशेष प्रकल्प) यांच्या अधिपत्याखाली स्थापन करण्यात आलेले आहेत. पुढील सर्व निर्णय या समितीमार्फत घेण्यात येतील.

वरील कृषी जोडणी व वसूली धोरणाची योग्य अंमलबजावणी होईल, याबाबत दक्षता घेण्यात यावी.

**मुख्य अभियंता (वितरण)**

**सहपत्र :** वरीलप्रमाणे

**प्रतिलिपि सविनय सादर :**

१. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, मराविविकंम., मुंबई.
२. संचालक (संचालन), मराविविकंम., मुंबई.
३. संचालक (वित्त), मराविविकंम., मुंबई.
४. संचालक (प्रकल्प), मराविविकंम., मुंबई.
५. संचालक (वाणिज्य), मराविविकंम., मुंबई.
६. संचालक (मा.सं.), मराविविकंम., मुंबई.

७. सहव्यवस्थापकीय संचालक, मराविविकंम, औरंगाबाद / कल्याण
८. क्षेत्रीय संचालक, मराविविकंम, नागपूर / पुणे.
९. कार्यकारी संचालक (सुरक्षा व अंमलबजावणी) मराविविकंम., हाँगकाँग बँक इमारत, मुंबई.
१०. कार्यकारी संचालक - २ (वितरण), मराविविकंम, मुंबई
११. कार्यकारी संचालक - ३ (पायाभूत आराखडा), मराविविकंम, मुंबई
१२. कार्यकारी संचालक - ४ (प्रकल्प), मराविविकंम, मुंबई
१३. कार्यकारी संचालक - (देयक व महसूल), मराविविकंम, मुंबई.

**प्रत सस्नेह रवाना :-**

१. विशेष कार्य अधिकारी, मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालकांचे कार्यालय, मराविविकंम., मुंबई.
२. मुख्य अभियंता, (वाणिज्य) / (नवीकरणीय ऊर्जा) / (वीज खरेदी) / (सामुग्री व्यवस्थापन) / (विशेष प्रकल्प) / (उच्चदाब वितरण प्रणाली) / (देयक व महसूल) / (प्रकल्प) / (चाचणी) / (स्थापत्य).
३. मुख्य अभियंता, सं. व सु. परिमंडल, मराविविकंम, कल्याण / भांडुप / रत्नागिरी / पुणे / बारामती / कोल्हापूर / नाशिक / जळगाव / लातूर / नांदेड / अकोला / औरंगाबाद / नागपूर / अमरावती / गोंदिया / चंद्रपूर
४. मुख्य महाव्यवस्थापक, (मा.सं.-अतांत्रिकआस्थापना) / (मा. सं.-तांत्रिक आस्थापना) / (निगम वित्त) / (निगम लेखा) / (माहिती व तंत्रज्ञान) / (अंतर्गत लेखा परिक्षा) / (प्र व सु), मराविविकंम, नाशिक.
५. मुख्य तपास अधिकारी, मराविविकंपनी मर्यादित, धारावी, मुंबई.
६. कंपनी सचिव, मराविविकंम., मुंबई.

**प्रत रवाना :-**

१. मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, मराविविकंम., मुंबई.
२. मुख्य जनसंपर्क अधिकारी, मराविविकंम., मुंबई.
३. अधीक्षक अभियंता (वीज दर नियामक कक्ष), मराविविकंम., मुंबई.
४. सर्व अधीक्षक अभियंते, सं व सु. मंडल कार्यालये, मराविविकंम.

As per mailing list.

# महाराष्ट्र शासन

## उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

## शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण-२०२०/प्र.क्र.१२१/ऊर्जा-५

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १८ डिसेंबर, २०२०.

**प्रस्तावना :-**

सद्यस्थितीत कृषीपंप वीज जोडणी देण्याकरिता उच्चदाब वितरण प्रणाली योजना दिनांक ०५ मे, २०१८ च्या शासन निर्णयान्वये कार्यरत आहे. सदर योजनेअंतर्गत दिनांक ३१ मार्च, २०१८ पर्यंत पैसे भरून वीज जोडणीकरिता प्रलंबित असणाऱ्या कृषीपंप वीज जोडण्या देण्यात येत आहेत.

दिनांक १ एप्रिल, २०१८ नंतर पैसे भरून वीज जोडणी करिता प्रलंबित असणाऱ्या कृषीपंप अर्जदारांकरीता योजना अस्तित्वात नाही. सद्यस्थितीत राबविण्यात येणाऱ्या उच्चदाब वितरण प्रणालीची प्रगती, इतर पध्दतीने वीज जोडणी देण्यावर येणारी मर्यादा, याचा विचार करता यापुढे संभाव्य कृषीपंप अर्जदारांकरिता एक सर्वकष योजना प्रस्तावित करण्यात येत आहे.

कृषीपंपांना विकेंद्रित सौर उर्जीकरणाच्या माध्यमातून दिवसा ८ तास वीज पुरवठा करण्यासंबधीचे नियोजन करणे / वितरण हानी टाळण्यासोबतच उपलब्ध वितरण प्रणालीचा पुरेपूर वापर होण्याच्या दृष्टीने कॅपॅसिटर बसविणे / कृषी ग्राहक थकबाकी वसूली करणे / सदर थकबाकी वसूली करीता ग्रामपंचायत, ग्रामविद्यूत व्यवस्थापक, महावितरण कर्मचारी, शेतकरी सहकारी संस्था यांना प्रोत्साहन देणे तसेच मिटरींग इत्यादी बाबी कृषीपंप धोरणात समाविष्ट करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्या अनुषंगाने शासनाने खालील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय:-**

(१) दिनांक ०१.०४.२०१८ पासून पैसे भरुन वीज जोडणीकरिता प्रलंबित असणाऱ्या कृषीपंप अर्जदारांना पारंपारिक पध्दतीने व सौरऊर्जेद्वारे वीज जोडणी देण्याकरीता प्रस्तावित कृषीपंप धोरणास मान्यता देण्यात येत आहे.

(२) सदर योजनेअंतर्गत पारंपारिक पध्दतीने कृषीपंप वीज जोडण्या देण्याकरिता येणारा वार्षिक अंदाजे खर्च रुपये १५०० कोटी शासनामार्फत महावितरण कंपनीस भागभांडवल (Equity) स्वरुपात देण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर भागभांडवल पुढील ५ वर्षे म्हणजे मार्च २०२४ पर्यंत महावितरण कंपनीस देण्यास मान्यता देण्यात येत आहे. याकरिता स्वतंत्र लेखाशिर्ष उघडण्यात यावे. तसेच याकरिता दरवर्षी अतिरिक्त नियतव्यय मंजूर करुन तो अर्थसंकल्पित करण्यास मान्यता देण्यात येत आहे. अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती वर्गवारीतील कृषीपंप लाभार्थ्यांना अनुक्रमे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग व आदिवासी विकास विभाग यांच्यामार्फत दरवर्षी आवश्यक नियतव्यय मंजूर करुन सदर निधी अर्थसंकल्पित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(३) सदर शासन निर्णयासोबत जोडलेले कृषीपंप धोरण राज्यात राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ४३९८ दिनांक :- १४/१२/२०२० अन्वये प्राप्त सहमती नुसार व मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२०१२१८१५११४३७३१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( ना. रा. ढाणे )**
**शासनाचे अवर सचिव**

**प्रत:**

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
४. मा. मंत्री (ऊर्जा) यांचे खाजगी सचिव
५. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधान परिषद, विधानमंडळ सचिवालय,विधानभवन, मुंबई.
६. मा. राज्यमंत्री (ऊर्जा) यांचे खाजगी सचिव
७. मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
८. अपर मुख्य सचिव (वित्त) मंत्रालय, मुंबई.
९. अपर मुख्य सचिव (नियोजन) मंत्रालय, मुंबई.
१०. प्रधान सचिव (कृषी) मंत्रालय, मुंबई.
११. प्रधान सचिव (ग्रामविकास) मंत्रालय, मुंबई.
१२. प्रधान सचिव (आदिवासी विकास) मंत्रालय, मुंबई.
१३. प्रधान सचिव (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य) मंत्रालय, मुंबई.
१४. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज मंडळ सुत्रधारी कंपनी मर्या., मुंबई- २३.
१६. अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१
१७. अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१
१८. अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य वीज पारेषण कंपनी, प्रकाशगंगा, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१
१९. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई / महाराष्ट्र-२, नागपूर
२०. महालेखापाल (लेखापरीक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई
२१. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२२. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई
२३. अवर सचिव (ऊर्जा-३), उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
२४. कक्ष अधिकारी, (अर्थसंकल्प/व्यय-१६), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
२५. कक्ष अधिकारी (नियोजन विभाग), मंत्रालय, मुंबई
२६. निवड नस्ती (ऊर्जा-५), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
२७. ऊर्जा विभागातील सर्व कार्यासने.

**शासन निर्णय क्रमांक- संकिर्ण-२०२०/प्र.क्र.१२१/ऊर्जा-५ दि. १८/१२/२०२० चे सहपत्र**

# कृषीपंप वीज जोडणी धोरण- २०२०

## अ) दिनांक ०१.०४.२०१८ पासून पैसे भरून वीज जोडणीकरिता प्रलंबित असणाऱ्या कृषीपंप अर्जदारांना वीज जोडणी देण्याकरिता धोरण :-

(१) ज्या नवीन कृषीपंप अर्जदाराच्या कृषीपंपाचे अंतर नजीकच्या लघुदाब वाहिनीच्या पोलपासून ३० मीटरच्या आत आहे व वितरण रोहित्रावर पर्याप्त क्षमता उपलब्ध आहे, अशा सर्व नवीन कृषीपंप अर्जदारांना १ महिन्याच्या आत वीज जोडणी देण्यात येईल.

(२) ज्या नवीन कृषीपंप अर्जदाराच्या कृषीपंपाचे अंतर नजीकच्या लघुदाब वाहिनीपासून २०० मीटरच्या आत आहे व वितरण रोहित्रावर पर्याप्त क्षमता शिल्लक आहे, अशा नवीन कृषीपंप अर्जदारांना एरीयल बंच केबलद्वारे ३ महिन्याच्या आत वीज जोडणी देण्यात येईल. तथापि, त्याकरीता आवश्यक असणारी लघुदाब वाहिनी / एरियल बंच केबल, अर्जदारास सुरुवातीस स्वत:च्या खर्चाने उभारावी लागणार असून, सदर खर्चाचा परतावा त्या ग्राहकाच्या वीज बिलामधून केला जाईल. जर अर्जदाराची यासाठी आर्थिक कुवत नसेल तर अशा अर्जदारांना First Come First Basis वर आर्थिक तरतूदीनुसार वीज जोडणी देण्यात येईल.

(३) ज्या नवीन कृषीपंप अर्जदाराच्या कृषीपंपाचे अंतर नजीकच्या लघुदाब वाहिनी पासून २०० मीटरपेक्षा जास्त आहे अशा कृषीपंप अर्जदारांना खालीलप्रमाणे पर्याय उपलब्ध असतील:-

(अ) उच्चदाब वाहिनी पासून ६०० मीटर पेक्षा जास्त अंतर असल्यास पारेषण विरहीत (Off Grid) सौर ऊर्जेवर वीज जोडणी घेता येईल. दरवर्षी १ लाख या प्रमाणे पुढील ५ वर्षात ५ लाख पारेषण विरहीत सौर कृषीपंप वीज जोडण्या मुख्यमंत्री सौर कृषिपंप योजनेच्या माध्यमातून आस्थापित करण्यात येतील.

(ब) उच्चदाब वितरण प्रणालीवर (HVDS) वीज जोडणी घेता येईल. त्याकरीता अर्जदाराला स्वत: किंवा इतर अर्जदारांसोबत (जास्तीत जास्त २ अर्जदार) एकत्रितपणे वीज जोडणीकरीता आवश्यक असणारी उच्चदाब वाहिनी व वितरण रोहित्र इत्यादी पायाभूत सुविधा उभाराव्या लागणार असून फक्त ६०० मीटर पर्यंतच्या पायाभूत सुविधेच्या खर्चाचा परतावा त्या ग्राहकाच्या वीज बिलामधून केला जाईल. सदर खर्चाच्या कमाल परताव्याची रक्कम मंजूर अंदाजपत्रकीय रक्कमेपर्यंत मर्यादित राहील.

(क) ज्या अर्जदाराची “ब” प्रमाणे कार्यवाही करण्यासाठी आर्थिक क्षमता नाही अशा अर्जदारांना त्यांच्या कृषीपंपाचे अंतर उच्च दाब वाहिनीपासून ६०० मीटरपेक्षा कमी असल्यास निधीच्या उपलब्धतेनुसार First Come First Serve Basis नुसार नवीन वीज जोडणी देण्यात येईल.

(४) अर्जदार समर्पित वितरण सुविधा योजना (डी.डी.एफ.) (ना-परतावा) अंतर्गत उच्चदाब वितरण प्रणालीवर स्वतंत्र वीज जोडणी घेण्यास इच्छूक असल्यास अशा अर्जदारास त्वरीत वीज जोडणी देण्यात येईल. अशा अर्जदारास उच्चदाब वीज वाहिनीची ६०० मी. अंतराची अट लागू असणार नाही.

(५) नवीन कृषीपंप अर्जदारांच्या कृषीपंपाचे अंतर नजीकच्या उच्चदाब वाहिनी पासून ६०० मीटरपेक्षा जास्त असल्यास व ते उच्चदाब वितरण प्रणालीवर डी.डी.एफ. योजनेअंतर्गत वीज जोडणी घेण्यास इच्छुक नसल्यास, अशा कृषीपंप अर्जदारांना पारेषण विरहीत (Off Grid) सौर कृषीपंपाच्या माध्यमातून वीज जोडणी दिली जाईल.

(६) नवीन कृषीपंप ग्राहकांना उच्चदाब वितरण प्रणालीवर १६/२५ के.व्ही.ए. क्षमतेच्या वितरण रोहित्रावर साधारणपणे जास्तीत जास्त २ वीज जोडण्या देण्यात येतील. कालवे/बंधारे/तळे/नदी इत्यादी लागत असणाऱ्या कृषीपंपांच्या समूहास वीज जोडणी देण्याकरीता ६३/१०० के.व्ही.ए. क्षमतेच्या वितरण रोहित्राच्या ८०% क्षमतेपर्यंत वीज जोडण्या देण्यात येतील. याकरीता अर्जदार स्वत: किंवा कृषीपंप ग्राहकांच्या समूहास, एच.व्ही.डी.एस. प्रणालीवर वीज जोडणी घेण्याकरीता लागणारी पायाभूत सुविधा (उच्चदाब वाहिनी, वितरण रोहित्र, लघुदाब एरियल बंच केबल इत्यादी) सुरुवातीला स्वखर्चाने उभारावी लागेल व झालेल्या खर्चाची परतफेड महावितरणद्वारे संबंधीत कृषी ग्राहकांच्या वीज बिलामधून करण्यात येईल.

(७) नवीन कृषीपंप अर्जदारांना लघुदाब वितरण प्रणालीवर वीज जोडणी देते वेळेस नजीकच्या वितरण रोहित्रावर पर्याप्त क्षमता उपलब्ध नसल्यास महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या कृती मानकांनुसार किंवा उपकेंद्रामध्ये पर्याप्त क्षमता उपलब्ध नसल्यास, अनुक्रमे ३ महिन्याच्या व १ वर्षाच्या आत महावितरणद्वारे पर्याप्त क्षमतेबाबत तरतूद केली जाईल व त्यानंतर अशा अर्जदारास वीज पुरवठा उपलब्ध करुन देण्यात येईल.

(८) उपविभागीय स्तरावर पैसे भरुन प्रलंबित असलेल्या कृषीपंपांच्या यादीच्या ज्येष्ठतेनुसार (डी.डी.एफ. योजना वगळता ) कृषीपंप अर्जदारांना वीज जोडणी देण्यात येतील. तथापि, भारतीय सेनेमधील (भूदल, नौदल व वायूदल) आजी व माजी सैनिक/अधिकारी यांना वीज पुरवठा देतांना प्राधान्य देण्यात येईल.

(९) पारंपारिक जोडणी असलेले विद्यमान कृषीपंप ग्राहक सौर कृषीपंपाच्या माध्यमातून स्वेच्छेने वीज जोडणी देण्याबाबत विनंती करीत असल्यास, सौर कृषीपंप आस्थापित करुन देण्यात येईल. तथापि, याकरीता ग्राहकाने पारंपारिक वीज पुरवठयाचे वीज बिल (थकबाकीसह) भरुन पारंपारिक वीज पुरवठा समर्पित करणे बंधनकारक राहील. सदर योजनेअंतर्गत कमाल ७.५ अश्वशक्ती क्षमतेचा सौरपंप ग्राहकांना देण्यात येईल व त्यासाठी ४०% खर्च ग्राहकाला करावा लागेल.

(१०) SC/ST/OBC/अल्पसंख्यांक प्रवर्गातील कृषीपंप धारकांना नवीन वीज जोडण्या देण्याकरिता संबंधित विभागांनी SCP/TSP/ महाज्योती इत्यादी योजने अंतर्गत निधी उपलब्ध करून द्यावा. तसेच शासनाच्या अखत्यारीतील मौलाना आझाद, अण्णाभाऊ साठे इत्यादी महामंडळांनी देखील लाभार्थींना नवीन वीज पुरवठ्यासाठी संपूर्ण अंदाजपत्रकीय रक्कमेच्या (प्रोसेसिंग शुल्क व अनामत रक्कम यांच्यासह) अनुषंगाने निधी उपलब्ध करून द्यावा.

(११) ग्राहकांना उपलब्ध करून देण्यात आलेल्या ONLINE PORTAL वर नवीन कृषीपंप विज जोडणीसाठी अर्ज करता येईल व निधीच्या उपलब्धतेनुसार संबंधित वर्गवारीतील कृषी ग्राहकांना पैसे भरून प्रलंबित असलेल्या ज्येष्ठता क्रमानुसार वीज जोडणी देण्यात येईल.

(१२) विद्यमान लघुदाब कृषीपंप ग्राहक वैयक्तिकरित्या किंवा वीज जोडणीच्या समुहामध्ये उच्चदाब वितरण प्रणालीवर वीज जोडणी घेऊ शकतात. तथापि, सदर ग्राहकांस वीज जोडणीकरीता आवश्यक असणारी ६०० मी. पर्यंतची उच्चदाब वाहिनी व १ वितरण रोहित्र इत्यादी पायाभूत सुविधा उभाराव्या लागणार असून सदर पायाभूत सुविधेच्या खर्च अर्जदारास उच्चदाब वितरण प्रणालीवर समर्पित वितरण सुविधा योजना (डी.डी.एफ.) (ना-परतावा) अंतर्गत स्वत: करावा लागेल व त्यास त्वरीत मंजुरी देण्यात येईल. अशा अर्जदारास उच्चदाब वीज वाहिनीची ६०० मीटर अंतराची अट लागू असणार नाही.

(१३) रत्नागिरी, सिंधुदुर्ग व रायगड जिल्हयाकरीता जागेच्या भौगोलिक परिस्थितीनुसार नवीन कृषीपंप वीज जोडणी ही सिंगल / थ्री फेजवर, लघुदाब वितरण प्रणालीवर/ उच्चदाब वितरण प्रणालीवर देण्यात येईल.

(१४) कृषी फीडरवर एसडीटी बसवून, मळ्यात राहणाऱ्या कृषीपंप ग्राहकांना घरगुती वापरासाठी तसेच शेतीवर आधारित उद्योगांसाठी सिंगल फेज वीज पुरवठा केला जाईल.

(१५) नवीन ग्राहकांसोबतच यापूर्वी महावितरण आपल्या दारी योजने अंतर्गत वीज जोडणी देण्यात आलेल्या व आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध नसलेल्या ग्राहकांना देखील वीज बिलातून परताव्याच्या माध्यमातून आवश्यक पायाभूत सुविधा उभारणीचा पर्याय उपलब्ध असेल.

(१६) कृषी ग्राहकांना वरील प्रमाणे पायाभूत सुविधा उभारताना, १.३% सुपरव्हिजन चार्जेस भरून महावितरणच्या निवड सूचीबद्ध (empaneled) कंत्राटदाराकडून परस्पर काम करून घेता येईल किंवा १०० % रक्कम महावितरणला भरणा करून, महावितरणद्वारे सदर काम करून घेण्याचा पर्याय देखील उपलब्ध असेल.

(१७) सदर योजने अंतर्गत ग्राहकांद्वारे उभारण्यात येणाऱ्या पायाभूत सुविधा यंत्रणेची गुणवत्ता राखण्यासाठी कामात वापरण्यात येणाऱ्या सामग्रीची तसेच कामाची तपासणी संबंधित अधिकारी / कर्मचाऱ्यांमार्फत करण्यात येईल. तसेच गुणवत्ता राखण्यासाठी सदर कामांपैकी ठराविक कामाची तपासणी (% checking) त्रयस्थ यंत्रणेमार्फत करण्यात येईल. कामाच्या गुणवत्ते व दर्जामध्ये निष्काळजीपणा आढळल्यास संबंधित अधिकारी / कर्मचारी यांना जबाबदार धरण्यात येईल. कंत्राटदाराने सदर कामात निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरल्याचे अथवा निकृष्ट दर्जाचे काम केल्याचे निदर्शनास आल्यास, अश्या कंत्राटदारावर महावितरणच्या Debar Policy प्रमाणे कारवाई करण्यात येईल.

(१८) अतिभारीत रोहीत्रांवरील चालू कृषी ग्राहकांना देखील योग्य दाबाने वीज पुरवठा करण्याच्या दृष्टीने विद्युत प्रणाली सक्षमीकरण (System Improvement) करण्याकरिता खालील पर्याय उपलब्ध असतील :-

१. सदर कामे महावितरणद्वारे, DPDC योजने अंतर्गत उपलब्ध होणाऱ्या निधीतून करण्यात येतील.

२. सदर कामे ग्राहकांना DDF (विना परतावा) योजने अंतर्गत करता येतील व त्यासाठी खर्चाच्या कमाल मर्यादेचे बंधन राहणार नाही.

मात्र, वरील उपलब्ध पर्यायाद्वारे कामे उच्चदाब प्रणालीच्या (HVDS) अनुषंगाने तसेच LT लाईन (AB Cable) ची कमाल मर्यादा रोहीत्रापासून २०० मिटर पर्यंत ठेवूनच करण्यात येतील.

(१९) नवीन कृषीपंप वीजजोडणीचा लाभ घेणाऱ्या कृषी ग्राहकाकडून वीज देयक नियमित न भरल्यास वीज पुरवठा खंडीत करण्याबाबतचे "सामाजिक जबाबदारी बंधपत्र" (Social Resposibility Bond) लिहून घेण्यात येईल.

(२०) महावितरणप्रती वीज ग्राहकांमध्ये सामाजिक दायित्व व संवेदनशीलता वाढविण्यासाठी माहिती-शिक्षण-संवाद (Information-Education-Communication-IEC) आधारित उपक्रम महावितरण मार्फत यथाशिघ्र राबविण्यात यावा.

**दरवर्षी सुमारे १ लाख कृषीपंप अर्जदारांना वीज जोडणी देण्याकरिता येणाऱ्या खर्चाचा तपशिल:**

| अ. क्र. | कृषीपंपाचे अंतर व वीज जोडणीची पध्दत | प्रती ग्राहक खर्च (रुपये) | कृषीपंप ग्राहकाची संभाव्य संख्या | एकूण खर्च (रुपये कोटी) | निधीची उपलब्धता (रु. कोटी) |
|---|---|---|---|---|---|
| १ | लघुदाब वाहिनीच्या पोल पासून ३० मीटरचे आत (सर्व्हिस वायरद्वारे) | ७,२०० | १०,००० | ७.२० | रु १५०० कोटी शासनाकडून भागभांडवल व उर्वरित खर्च महावितरणतर्फे |
| २ | लघुदाब वाहिनीच्या पोल पासून २०० मीटरचे आत (वैयक्तिक किवा समूह, एरियल बंच केबलद्वारे) तसेच उच्चदाब वाहिनीच्या पोल पासून ६०० मीटर पर्यंत (उच्चदाब वितरण प्रणालीव्दारे) | - | ९०,००० | १७२३.८४ | |
| ३ | उच्चदाब वाहिनीच्या पोल पासून ६०० मीटर पेक्षा जास्त (सौर कृषीपंपाद्वारे) | १,९८,४८५ | १,००,००० | १,९८४.८५ | ग्राहक, शासन अनुदान व ToSE च्या माध्यमातून |
| ब | एकूण : अ+ब | | २,००,००० | ३,७१५.८९ | |

## ब) कॅपेसिटर : उपयुक्तता आणि वापर

१. वितरण प्रणालीचे अतिभारीत होणे तसेच कमी दाबाने विद्युत पुरवठा होणे यासाठी कमी Power Factor ही प्रमुख कारणे आहेत. हे टाळण्यासाठी कृषिपंप ग्राहकांनी त्यांच्या पंपासाठी योग्य क्षमतेचा कॅपेसिटर बसविणे अत्यंत आवश्यक आहे.

२. कॅपेसिटर बसविल्यामुळे वितरण प्रणालीवरील किमान १५ ते २० % भार कमी होऊन, उपलब्ध वितरण प्रणालीचा पुरेपूर वापर होईल व अधिकाधिक ग्राहकांना योग्य दाबाने वीज पुरवठा देणे शक्य होईल.

३. वितरण प्रणालीवरील वीज भार कमी झाल्यामुळे नवीन वीज यंत्रणा उभारण्यासाठी होणाऱ्या खर्चामध्ये देखील बचत होईल. त्यासाठी, कृषी वाहिन्यांवर तसेच उपकेंद्रामध्ये योग्य क्षमतेचे कॅपेसिटर लावण्याची मोहीम देखील हाती घेण्यात येईल.

४. सर्व कृषी ग्राहकांना देखील त्यांच्या कृषीपंपावर कॅपेसिटर बसविणे आवश्यक राहील. त्या अनुषंगाने नादुरुस्त रोहित्र बदलवितांना, संबंधित रोहित्रावरील किमान ८०% ग्राहकांनी योग्य क्षमतेचे कॅपेसिटर त्यांच्या कृषी पंपावर बसविणे सक्तीचे करण्यात येईल. सोबतच किमान ८०% ग्राहकांनी त्यांचे चालू बिल भरल्याशिवाय नादुरुस्त रोहित्र बदलण्यात येणार नाही.

५. सदर कॅपेसिटर महावितरणद्वारे सूचीबद्ध कंत्राटदारांच्या माध्यमातून तालुका स्तरावर उपलब्ध करून देण्यात येतील व त्याची रक्कम ग्राहकांना भरावी लागेल.

**ग्रामीण भागातील वीज वितरण जाळे:-**

वीज वितरण जाळे उभारण्यासाठी आवश्यक असणाऱ्या अतिरिक्त रोहीत्रांची, पॉवर ट्रान्सफॉर्मरची तसेच नवीन सबस्टेशनची उभारणी महावितरणद्वारे पुढील प्रमाणे करण्यात येईल.

➢ **वितरण रोहित्रे :**

वाढीव वीजभारामुळे चालू वितरण रोहीत्र अतिभारीत झाले असेल तर अश्या ठिकाणी नवीन वितरण रोहीत्राची उभारणी ३ महिन्याच्या आत प्राधान्याने खालील प्रमाणे करण्यात येईल. .

१) १२५ टक्कयांपेक्षा जास्त अतिभारीत असलेले रोहित्र.

२) १२५ टक्कयांपर्यंत अतिभारीत असलेले रोहित्र

➢ **उपकेंद्र :**

- कृषी प्रवण भागातील स्थापित उपकेंद्राची क्षमता वाढ करताना किंवा नवीन उपकेंद्र उभारताना, स्थापित उपकेंद्रापासून ५ किमीच्या हद्दीत मिनी सोलर पार्क उभारण्याचा किंवा कृषी वाहिन्यांचा “सौर उर्जीकरणाचा” पर्याय प्राधान्याने तपासण्यात येईल व शक्य झाल्यास अश्या ठिकाणी वीज उपकेंद्राचे सौर ऊर्जीकरण करण्यात येईल.
- चालू असलेले उपकेंद्र (पॉवर ट्रान्सफॉर्मर) अतिभारीत असेल आणि त्याठिकाणी वीज जोडणीची मागणी असेल तर अश्या उपकेंद्रातील पॉवर ट्रान्सफॉर्मरची क्षमता वाढविणे किंवा अतिरिक्त पॉवर ट्रान्सफॉर्मर लावणे किंवा गरज असल्यास नवीन उपकेंद्रे उभारणे ही कामे खाली दिलेल्या प्राधान्यक्रमानुसार हाती घेण्यात येऊन नियमित कालावधीत पूर्ण करण्यात येतील.

  १) ८० टक्क्यांपेक्षा जास्त भारीत उपकेंद्र

  २) ६०- ८० टक्क्यांपर्यंत भारीत असेलेले उपकेंद्र
- दूर्गम, डोंगराळ किंवा आदिवासी भागामध्ये सद्यस्थितीत असलेले उपकेद्र अतिभारीत नसतांनाही वीज वाहिन्यांच्या अतिरिक्त लांबीमुळे जर कमी विद्युत दाबाच्या समस्या

निदर्शनास येत असतील तर अश्या ठिकाणी स्थापित उपकेंद्रामध्ये क्षमता उपलब्ध असतांनाही सोलर प्रकल्प किंवा नवीन उपकेंद्र स्थापित करण्यात येईल.

**क) कृषी ग्राहक थकबाकी वसूली:-**

१. महावितरण कंपनी विविध वर्गवारीतील एकूण २.७३ कोटी ग्राहकांना वीजपुरवठा करीत असून त्यापैकी ४२,६०,४३१ ग्राहक हे कृषी वर्गवारीतील आहेत.

२. कृषी ग्राहकांकडील वीजबिल वसुली हा चिंतेचा विषय असून मागील काही वर्षात ही वसुली नगण्य आहे. परिणामी डिसेंबर-२०१९ पर्यंत कृषी ग्राहकांची वीजबिल थकबाकी जवळपास रुपये ३७,००० कोटीपर्यत (व्याज आणि विलंब आकारासह) पोहोचलेली आहे. कृषी ग्राहकांकडील थकबाकी वाढीची प्रमुख कारणे:-

- कृषी वीज वापरापोटीचे राज्य शासनातर्फे देण्यात येणाऱ्या अनुदानात २०१२ पासून कुठलीही वाढ न होणे.
- महाराष्ट्र वीज नियामक आयोगाद्वारे करण्यात येणारी वार्षिक वीजदरवाढ संपूर्णपणे कृषी ग्राहकांवर परावर्तीत होणे.
- थकबाकीवर वाढत चाललेले व्याज आणि विलंब शुल्क.
- वीजपुरवठा खंडित करतांना येणाऱ्या विविध अडचणी.

३. महावितरणने कृषी थकबाकी वसुलीसाठी कृषी संजीवनी योजना - २०१५ आणि मुख्यमंत्री कृषी संजीवनी योजना - २०१७ यांसारख्या अनेक योजना यापूर्वी राबविल्या आहेत. मात्र, त्यास ग्राहकांकडून विशेष प्रतिसाद मिळालेला नाही.

४. महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या (बहुवार्षिक वीजदर प्रस्ताव) दि. ३०.०३.२०२० च्या आदेशात वसुली कार्यक्षमतेचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आलेले आहे व उद्दिष्टपूर्ती न झाल्यास महावितरण कंपनीवर दंड आकारण्यात येणार आहे. सबब, कृषी ग्राहकांकडील थकबाकी वसुलीसाठी सर्वसमावेशक योजना सादर करणे अत्यंत आवश्यक आहे.

**थकबाकी वसुली योजनेची ठळक वैशिष्टे:-**

१. सर्व उच्चदाब, लघुदाब, तसेच उपसा जलसिंचन योजनेतील चालू व कायमस्वरुपी वीजपुरवठा खंडित असलेले ग्राहक या योजनेत भाग घेण्यासाठी पात्र असतील.

२. महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या (बहुवार्षिक वीज दर प्रस्ताव) दि. ३०.३.२०२० च्या आदेशात मागील पाच वर्षातील कृषी वीजवापर पुन:निर्धारित केलेला आहे. त्या अनुषंगानेच जास्तीत जास्त कृषी ग्राहकांना सदर योजनेत सहभागी होणे शक्य व्हावे याकरिता ग्राहकांची मागील ५ वर्षापर्यंतची वीजबिल दुरुस्ती मोहीम राबविण्यात येईल.

३. ग्राहकांनी भरलेली वीजबिलाची रक्कम अशा सुधारित देयकापोटी समायोजित केली जाईल.

४. सदर योजनेमध्ये सहभागी होणाऱ्या ग्राहकांच्या ५ वर्षापर्यंतच्या थकबाकीवरील विलंब आकार पूर्णपणे (१००%) माफ करण्यात येऊन, सदर थकबाकीवर व्याज १८ टक्क्यांपर्यंत न आकारता,

महावितरणने घेतलेल्या कर्जावरील सरासरी व्याजदराच्या अनुषंगाने आकारण्यात येऊन थकबाकी निश्चित केली जाईल. (थकबाकी P)

५. पाच वर्षांपुर्वीच्या थकबाकीवरील विलंब आकार व व्याज १०० टक्के माफ केले जाईल व केवळ मूळ थकबाकीच वसुलीसाठी ग्राह्य धरण्यात येईल. (थकबाकी Q)

६. त्यानुसार सदर योजनेसाठी अंतिम नवीन थकबाकी (A=P+Q) अशी निश्चित केली जाईल.

७. सदर योजना पुढील ३ वर्षांसाठी म्हणजे दिनांक ३१ मार्च, २०२४ पर्यंत लागू असेल. तसेच या योजने अंतर्गत कृषी ग्राहकांची थकबाकी तीन वर्षांसाठी स्थितप्रत करण्यात येईल व ग्राहकांच्या वीज बिलामध्ये ती वेगळी दर्शविण्यात येईल.

| योजनेचे वर्ष | भरावयाची थकबाकी | भरलेली थकबाकी | सुट | शिल्लक थकबाकी |
|---|---|---|---|---|
| प्रथम वर्ष | A | X | X | B = A- २ X |
| दुसरे वर्ष | B | Y | Y चे ३०% | C = B - १.३*Y |
| तिसरे वर्ष | C | Z | Z चे २०% | अंतिम थकबाकी = C - १.२*Z |

८. या योजनेत एकदा सहभागी झालेला ग्राहक प्रत्येक चालू बिलासह त्याच्या सोयीनुसार थकबाकी भरू शकतो (उदा. ३ महिने / ६ महिने इत्यादी.)

९. वीजबिल वसुली योजनेत सहभागी होणाऱ्या कृषी ग्राहकांना चालू वीजबिल भरणे क्रमप्राप्त राहील व तसे न केल्यास सदर ग्राहकांचा वीज पुरवठा खंडित करण्यात येईल.

१०. एखाद्या महिन्यात काही कारणांमुळे जर कृषी ग्राहकांना चालू वीजबिल भरणे शक्य झाले नाही तर सदर योजनेत सहभागी राहण्यासाठी त्याला चालू आर्थिक वर्षातील एकत्रित थकबाकी त्याच वर्षात भरण्याची मुभा राहील. मात्र, थकीत चालू वीजबिलांवर नियमाप्रमाणे व्याज व विलंब आकार ग्राहकांना भरावा लागेल.

११. अनधिकृतरित्या वीज वापर करणाऱ्या ग्राहकांवर विद्युत अधिनियम, २००३ प्रमाणे कारवाई करण्यात येईल.

**ग्रामपंचायतीमार्फत वसूली (मायक्रोफ्रन्चायजी) :-**

१. ग्रामपंचायत ही स्थानिक स्वराज्य संस्था आहे. लोकांद्वारे निवडलेले आणि स्थानिक रहिवासी म्हणून कृषी ग्राहकांशी त्यांचे सलोख्याचे संबंध असतात. त्यामुळे कृषी ग्राहकांना वीजबिल भरण्यासाठी प्रोत्साहित करण्यास ग्रामपंचायतीची मदत व सहभाग महत्वाचा ठरेल.

२. विद्युत अधिनियम - २००३ च्या तरतुदीनुसार ग्रामीण भागात -मायक्रोफ्रेंचायझी तयार करून याद्वारे वीजबिल (चालू /थकीत) वसुली सहज शक्य आहे. या योजनेची यशस्वी अंमलबजावणी झाल्यास त्याचा लाभ महावितरण, ग्रामपंचायत आणि ग्रामीण ग्राहकांना होईल.

३. वसुलीसाठी सर्व इच्छूक ग्रामपंचायती (ज्या ग्रामपंचायती ग्रामसभेचा ठराव करतील) सोबत करार करून त्याची अंमलबजावणी केली जाईल.

४. कृषी वीजबिल वसुली योजना राबवितांना तसेच कृषी ग्राहकांचे सर्वेक्षण करतांना ग्रामपंचायत स्तरावरील, कृषी संबंधित इतर विभागातील कर्मचारी उदा. कृषी सहाय्यक, कोतवाल यांची देखील मदत घेण्यात येईल व त्याकरिता प्रोत्साहन म्हणून ग्रामपंचायत स्तरावरील पात्र कर्मचाऱ्यांना प्रोत्साहनपर रक्कम देण्याचे अधिकार जिल्हा वीज संनियंत्रण समितीला राहतील.

५. ग्रामपंचायतीला प्रस्तावित मोबदला खालीलप्रमाणे राहील.

१. वीज बिल भरणा केंद्र म्हणून प्रती वीजबिल वसुलीसाठी रु.५/- निश्चित.
२. थकबाकी वसूल केल्यास, वसूल केलेल्या थकबाकीच्या ३०%
३. चालू वीजबिल वसूल केल्यास, वसुली रकमेच्या २०%

६. इतर सर्व ठिकाणी सदर योजना रोहित्र स्तरावर राबवून, योजनेचा सर्व फायदा थेट सहभागी होणाऱ्या रोहित्रावरील कृषी ग्राहकांना देण्यात येईल. १००% वीजबिल वसुली असलेल्या रोहीत्रावरील ग्राहकांना चालू वीजबिलावर १०% अतिरिक्त सुट देण्यात येईल. तसेच, थकबाकी नसणाऱ्या व नियमित वीजबिल भरणाऱ्या कृषी ग्राहकांना सदर योजनेच्या कालावधीत चालू कृषि वीजबिलावर अतिरिक्त ५ % सवलत देण्यात येईल.

- **<u>ग्रामपंचायतींना प्रोत्साहन</u>**

ग्रामपंचायतींना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने ग्रामपंचायतीकडे कृषीग्राहकांसोबतच इतर ग्राहकांकडील वीजबिल वसुलीची कामे देण्याचेही प्रस्तावित आहे. अकृषक ग्राहकांकडील थकबाकीमधून ग्रामपंचायतीद्वारे वाढीव वसुलीक्षमतेच्या वसुलीवरील २० टक्के मोबदला तसेच चालू बिलांच्या वसुलीसाठी वाढीव वसुलीचा स्लॅबनिहाय मोबदला खालीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहे.

| मागील आर्थिक वर्षातील सरासरी वसुलीची कार्यक्षमता | ग्रामपंचायतीने प्राप्त केलेल्या वसुलीची कार्यक्षमता | फरक C= (B-A) | फरकातील प्रोत्साहन (वाढीव वसुली क्षमतेच्या) |
|---|---|---|---|
| A | B | C | D |
| ०-५० टक्के | | | २० टक्के |
| ५०-७५ टक्के | | | १५ टक्के |
| ७५ टक्केपेक्षा जास्त | | | १० टक्के |

* गाव पातळीवर सहकारी संस्था, महिला बचत गट, “महिलांचा स्वयं सहाय्यता गट” (Women's SHGs) इत्यादींची “वीज देयक संकलक एजन्सी” (Electricity Bill Collection Agency) म्हणून नेमणूक करण्यात येईल व त्यांनादेखील वरील प्रोत्साहन उपलब्ध असेल.

➢ **कर्मचाऱ्यांसाठी प्रोत्साहन:-**

कृषी ग्राहकांसाठी राबविण्यात येणाऱ्या सदर योजनेच्या व्यापक यशासाठी क्षेत्रीय स्तरावरील कर्मचाऱ्यांचा सहभाग असणे आवश्यक असून ही योजना यशस्वी करण्यासाठी क्षेत्रीय कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन देण्यावर भर देण्यात आला आहे.

| अ.क्र. | थकबाकी | प्रस्तावित प्रोत्साहन | पदनाम |
|---|---|---|---|
| १ | **चालू थकबाकी** | | |
| | | वसूल केलेल्या रक्कमेवर १ टक्के | लाईन स्टाफ |
| | | वसूल केलेल्या रक्कमेवर ०.५० टक्के | शाखा प्रमुख |
| | | वसूल केलेल्या रक्कमेवर ०.२५ टक्के | उपविभागीय अधिकारी |
| | | वसूल केलेल्या रक्कमेवर ०.२५ टक्के | उपविभागीय बिलींग कर्मचारी एकत्रितपणे |
| २ | **कायमस्वरूपी थकबाकी** | वसूल केलेल्या रक्कमेवर १० टक्के | लाईन स्टाफ |
| | | वसूल केलेल्या रक्कमेवर ५ टक्के | शाखा प्रमुख |
| | | वसूल केलेल्या रक्कमेवर २.५ टक्के | उपविभागीय अधिकारी |
| | | वसूल केलेल्या रक्कमेवर २.५ टक्के | उपविभागीय बिलींग कर्मचारी एकत्रितपणे |

**टिप :-** ग्रामपंचायतीद्वारे करण्यात येणाऱ्या वीजबिल वसुलीमध्ये महावितरणच्या जनमित्रांचा देखील सहभाग असणार हे लक्षात घेऊन ग्रामपंचायतीद्वारे वसूल करण्यात आलेल्या वीजबिल वसुलीपैकी १ टक्के रक्कम ही महावितरणच्या संबंधित जनमित्रांना प्रोत्साहनपर देय राहील.

➢ **उर्जामित्रांना (ग्राम विद्युत व्यवस्थापक) प्रोत्साहन:-**

कृषी ग्राहकांसाठी राबविण्यात येणाऱ्या सदर योजनेच्या व्यापक यशासाठी ग्रामस्तरावरील उर्जामित्रांचा सहभाग देखील अपेक्षित आहे. त्या अनुषंगाने,

१. ज्याठिकाणी विज बिल वसुली ग्राम पंचायत किंवा रोहित्र स्तरावर कार्यरत नाही त्याठिकाणी त्यांनी वसूल केलेल्या चालू बिलाच्या रक्कमेतून ५% व थकबाकी रक्कमेच्या वसुलीच्या १०% रक्कम ऊर्जामित्रांना प्रोत्साहन पर रक्कम देण्यात येईल. तसेच, जिल्हास्तरावर आवंटीत केलेल्या निधीमधून ग्रामपंचायत स्तरावरील उदा. कृषी सहाय्यक, कोतवाल इत्यादी कर्मचाऱ्यांना प्रोत्साहनपर ५ टक्क्यांपर्यंत रक्कम देऊ शकतील.

२. ज्याठिकाणी ग्रामपंचायतीद्वारे करण्यात येणाऱ्या वीजबिल वसुलीमध्ये महावितरणचा जनमित्र उपलब्ध नाही त्याठिकाणी उर्जा मित्रांचा सहभाग असणार हे लक्षात घेऊन ग्रामपंचायतीद्वारे वसूल करण्यात आलेल्या वीजबिल वसुलीपैकी १ टक्के रक्कम ही संबंधित उर्जा मित्रांना प्रोत्साहनपर देय राहील.

➢ **शेतकरी सहकारी संस्था तसेच साखर कारखान्यांना प्रोत्साहन:**

कृषीपंप ग्राहकांची थकबाकीची रक्कम वसूल केल्यास शेतकरी सहकारी संस्था तसेच साखर कारखान्यांना वसूल केलेल्या रक्कमेच्या १० टक्के रक्कम प्रोत्साहन म्हणून देण्यात येईल.

**कृषिपंपधारक ग्राहकांसाठी पायाभूत सुविधांचे सक्षमीकरण करणे:**

१. कृषिपंपधारकांडून वसूल झालेल्या रक्कमेसाठी स्वतंत्र खाते महावितरणच्या मंडळस्तरावर ठेवले जाईल व वसूल करण्यात आलेल्या रक्कमेचा वापर हा संबंधित ग्रामीण भागातील महावितरणच्या विजेच्या पायाभूत सुविधा (नवीन तसेच सक्षमीकरण) तसेच सेवा सुधारण्याकरिता केला जाईल.

सदर सुधारणांवर खर्च करताना, पायाभूत सुविधा सुधारण्यासंबंधी शिफारस करण्याचे अधिकार खालीलप्रमाणे असतील व त्यास विभागीय / मंडळ / मुख्यालय स्तरावर मंजुरी देण्यात येईल ;

- **३३% रक्कम संबंधित ग्रामपंचायती करिता** -

वसूल झालेल्या ३३% रक्कमेपर्यंत मंजुरी देण्याचे अधिकार महावितरणच्या विभागीय कार्यकारी अभियंत्यास असतील.

- **३३% रक्कम जिल्ह्याकरिता एकत्रितपणे** -

जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींकडून जिल्हास्तरावर एकत्रितपणे वसूल झालेल्या रक्कमेच्या ३३% रक्कमेपर्यंत मंजूरी देण्याचे अधिकार जिल्ह्याचे पालकमंत्री व महावितरणच्या संबंधित मंडळ अधीक्षक अभियंत्यास असतील. नवीन उपकेंद्र व संबंधित वाहिन्यांच्या मंजुरीचे अधिकार महावितरण मुख्यालय स्तरावर असतील.

वरीलप्रमाणे जिल्हास्तर वसुलीमधून पायाभुत उभारणीवर खर्च करण्यात आलेल्या कामाचा तपशील जिल्हा संनियंत्रण समितीस त्रैमासिक स्तरावर सादर करण्यात यावा.

२. या नाविन्यपूर्ण योजनेत जास्तीतजास्त ग्राहकांनी सहभागी व्हावे याकरिता जिल्ह्यांचे पालकमंत्री, खासदार व आमदार यांचे सहकार्य अपेक्षित आहे.

**ड) राज्यातील कृषी ग्राहकांना ८ तास दिवसा वीजपुरवठा**

१. महावितरण कंपनीद्वारे एकूण २१५ लाख एचपी भार असलेल्या जवळपास ४३ लाख कृषी ग्राहकांना वीज पुरवठा केला जातो.

२. महावितरणच्या एकूण विजेच्या मागणीपैकी जवळपास २५ ते ३०% वीज वापर हा कृषी क्षेत्राद्वारे केला जातो.

३. सद्यस्थितीत, संपूर्ण राज्यात मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांच्या निर्देशानुसार कृषी वीज ग्राहकांना दिवसा ८ तास किंवा रात्री १० तास असा ३ फेज वीज पुरवठा चक्राकार पद्धतीने करण्यात येत आहे.

४. मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने महावितरण कंपनीची दि. ३०/०३/२०२० रोजीच्या आदेशान्वये केलेली बहुवार्षिक वीजदर निश्चिती ही कृषी वीज ग्राहकांना दिवसा ८ तास किंवा रात्री १० तास अशा चक्राकार पद्धतीने केला जाणारा ३ फेज वीज पुरवठा गृहीत धरून होणाऱ्या वीज वापरावर आधारित असून त्यात बदल करण्याचे अधिकार महावितरण कंपनीस नाहीत.

५. महावितरणने दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी संभाव्यता पडताळून खालील योजना प्रस्तावित केली आहे.

**विकेंद्रित सौर ऊर्जाप्रकल्पांच्या माध्यमातून दीर्घकालीन योजना:-**

१) विद्युत वितरण उपकेंद्रांशी थेट जोडलेल्या विकेंद्रित सौर उर्जा प्रकल्पांमधून कृषी ग्राहकांना दिवसा वीजपुरवठा देणे शक्य आहे. त्याअनुषंगाने कृषी ग्राहकांची दिवसाची विजेची मागणी लक्षात घेता वितरण उपकेंद्र स्तरावर विकेंद्रित सौर उर्जा प्रकल्प उभारून दिवसा वीजनिर्मिती करण्यात येईल.

२) मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना (विकेंद्रित सौर उर्जा निर्मिती) पासून कृषी ग्राहकांना दिवसा वीज पुरवठा करणे, वीज वितरण हानी घटविणे आणि ट्रान्समिशन इन्फ्रास्ट्रक्चर खर्च टाळणे इत्यादीं लाभ घेता येतील.

३) कृषी ग्राहकांच्या अतिरिक्त ५,२०० मेगावॅट वीजभाराला दिवसा ८ तास वीज पुरवठा करण्यासाठी सुमारे ८,५०० मेगावॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पांची आवश्यकता आहे.

४) त्याकरिता निविदांद्वारे अंदाजे ४,२०० मेगावॅट सौर उर्जा क्षमता करारीत केलेली आहे आणि त्यापैकी २,२३९ मेगावॅट क्षमतेचे सौर उर्जा प्रकल्प कार्यान्वित करण्यात आलेले आहेत.

५) दिवसा कृषी ग्राहकांना वीज पुरवठा करण्यासाठी आणि नुतनशील उर्जा खरेदीचे बंधन लक्ष्य पूर्ण करण्यासाठी ४५०० ते ५००० मेगावॅट विकेंद्रित सौर उर्जा क्षमता प्राप्त करण्यासाठी प्रकल्प राबविण्यात येईल.

६) विकेंद्रित सौर ऊर्जा प्रकल्पांच्या तसेच इतर सौर ऊर्जा प्रकल्पांच्या माध्यमातून सर्व कृषी ग्राहकांना पुढील ३ वर्षात दिवसा ८ तास वीज पुरवठा करण्याचे प्रयत्न महावितरणद्वारे करण्यात येतील.

**ई) <u>मिटरींग</u>**

१. उच्च दाब वीज वाहिन्या:

- सबस्टेशनमधून बाहेर पडणाऱ्या सर्व वीज वाहिन्यांचे AMR मिटरींग करण्यात आलेले आहे. प्रामुख्याने कृषी वीज वाहिन्यांवर बसविण्यात आलेल्या मिटर्सची पुन:पडताळणी जून २०२१ पर्यंत पूर्ण करण्यात येईल.

२. वितरण रोहित्रे :

- महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने स्थापन केलेल्या अभ्यासगटाच्या अहवालात नमूद करण्यात आलेल्या ५०२ कृषी वाहिन्यांवरील सर्व वितरण रोहीत्रांचे जून - २०२१ पर्यंत मिटरींग करण्याचे उद्दिष्ट आहे, जेणेकरून या वीज वाहिन्यावरील कृषी वीज वापराचा सखोल अभ्यास करता येईल.
- उपरोक्त मिटरींगची उपयुक्तता लक्षात घेऊन, नंतर उर्वरित कृषी वीज वाहिन्यांवरील वितरण रोहित्रांच्या मिटरींगचे काम टप्प्याटप्याने हाती घेण्यात येईल.

३. कृषी ग्राहक :

- उच्चदाब वीज प्रणालीच्या माध्यमातून देण्यात येणाऱ्या सर्व नवीन कृषी वीज जोडण्या मा. वीज नियामक आयोगाच्या निर्देशानुसार प्रीपेड मीटरद्वारे देण्यात येतील.
- कृषी ग्राहकांचे मिटरींग तसेच त्यांची देखभाल करतांना येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन इतर वाहिन्यांवरील (उच्चदाब वितरण प्रणाली व्यतिरिक्त) कृषी ग्राहकांना विना मीटर वीज पुरवठा करण्यात येईल. अश्या कृषी ग्राहकांना त्यांचा जोडभार व वाहिनीवरील वीज वापराच्या अनुषंगाने फिडर इंडेक्सच्या माध्यमातून वीज वापर तपासून वीज बिल देण्यात येईल.

****************************************